७० वर्ष
निर्भीड पत्रकारितेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. १८ जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २०३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# सिंचन प्रकल्पांसाठी भरीव तरतूद

## प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत २० प्रकल्प पूर्ण; ४.३० लाख हेक्टर सिंचन

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यातील सिंचन प्रकल्पांसाठी शासन मोठ्या प्रमाणात तरतूद करत असून हे प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी जलसंपदा विभागाने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. बैठकीस जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री (तापी कोकण पाटबंधारे महा विकास महामंडळ) गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदरे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सचिव (लाभक्षेत्र विका) जयंत बोरकर, राज्यातील सर्व पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत नारपार गिरणा नदीजोड प्रकल्प, दमणगंगा एकदरे गोदावरी, दमणगंगा वैतरणा गोदावरी, कोकण उल्हास-वैतरणा व गोदावरी खोरे नदीजोड प्रकल्प यांचा आढावा घेण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात नदी जोड प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, बळीराजा जलसंजीवनी योजना यामधून अनेक प्रकल्प सुरू आहेत. राज्याच्या सिंचन व्यवस्थेमध्ये यामुळे मोठे बदल होणार आहे. विभागाने यासंदर्भात पारदर्शकपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प सह गोदावरी खोऱ्यातील वैनगंगा उपखोऱ्यातील ६३.७४ टीएमसी पाणी बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा उपखोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाची सिंचनक्षमता ६,११,१५० हेक्टर असून ते भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम या आठ जिल्ह्यात विभागले आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत राज्यातील योजनेतील २० प्रकल्प पूर्ण झाले असून, ७ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. मार्च २०२६ पर्यंत ४.३० लाख हेक्टर, म्हणजेच ७४ टक्के सिंचन क्षमता निर्माण करण्यात यश आले आहे. यामध्ये २९ मोठे व मध्यम सिंचन प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पांची एकूण किंमत २४ हजार ७२१ कोटी रुपये असून, त्यासाठी ४ हजार २८८ कोटी रुपयांच्या (१७ टक्के) केंद्रीय सहाय्य आहे. या योजनेअंतर्गत ५.७९ लाख हेक्टर अंतिम सिंचन क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट असून यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी याचा आढावा घेतला.

केंद्र शासनाने विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील कृषी क्षेत्रातील संकटावर मात करण्यासाठी विशेष पॅकेज अंतर्गत बळीराजा जलसंजीवनी योजना सुरू केली. या योजनेमध्ये ८ मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प तसेच ८३ भूपृष्ठीय लघु सिंचन प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी विकसित महाराष्ट्र अंतर्गत जलसंपदा विभागाकडून करण्यात येणारी कार्यवाहीबाबत माहिती देण्यात आली.

# पुण्यात १८ वर्षीय तरुणीने उचललं टोकाचं पाऊल

## राहत्या घरीच जीवन संपवलं, आई-वडिलांवर दु:खाचा डोंगर

**पुणे (दै. संध्या)**




शिक्षणाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या पुण्य नगरीत गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असून नव्या पिढीकडे, झेन झी तरुणाईकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. अनेकदा तरुणाईकडून किरकोळ कारणावरुन आपलं जीवन संपवल्याच्या धक्कादायक घटनाही घडत आहेत. आपल्या कुटुंबीयांचा विचार न करता, आई-वडिलांची काळजी न करत हे टोकाचे पाऊल उचलले जाते. आता, पुण्यात 18 वर्षीय तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना उघडकीस आली आहे. नीट परीक्षेतील कमी गुणामुळे तिने हा निर्णय घेतल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

पुण्यातील काळेपडळ भागातील परिसरात आज सकाळी ही दुर्दैवी घटना उघडकीस आली, अनुष्का चौगुले (18 वर्षे) असं आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. अनुष्काच्या आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मात्र नीट परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे टोकाचे पाऊल उचलल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे. कारण, नीट परिक्षेचा निकाल लागल्यानंतर काही तासांतच तिने हा टोकाचा निर्णय घेतल्याने कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षा म्हणजेच नीटच्या पुनर्परिक्षेचा निकाल 16 जून रोजी देशभरात जाहीर झाला. त्यानंतर, अनेकांनी आपले गुण शेअर करत आनंद साजरा केला. मात्र, काहींना गुण कमी मिळाल्याने दु:ख झाल्यचंही पाहायला मिळालं. अनुष्कानेही नीट परीक्षा दिली होती, अशी माहिती आहे.

# आरोपी मोटगावकरांच्या ‘RCC’ची री-नीट निकालात भरारी

**मुंबई (दै. संध्या)**



■ ५५० विद्यार्थ्यांना ५३० हून अधिक गुण

देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाचे केंद्रस्थान ठरलेल्या लातूरमधून आता एक मोठी बातमी समोर आली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणातील मुख्य आरोपी असलेले शिवराज मोटेगावकर यांच्या 'आरसीसी कोचिंग क्लासेस'ने री-नीट परीक्षेत उल्लेखनीय निकाल नोंदवला आहे. आरसीसीमधील 2,200 विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. त्यापैकी 36 विद्यार्थ्यांनी 600 पेक्षा अधिक गुण मिळवले असून, 530 पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे साडेपाचशेच्या घरात आहे.

नीट पेपरफुटीच्या महाघोटाळ्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही री-नीट परीक्षा अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्थेत आणि पारदर्शक पद्धतीने घेण्यात आली होती. या काळात केंद्रीय तपास यंत्रणांचे आणि प्रशासनाचे विशेष लक्ष लातूरमधील परीक्षा केंद्रांवर होते. अशा कठीण परिस्थितीतही आरसीसीच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामुळे शैक्षणिक वर्तुळात पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचल्यानंतर सीबीआयने मोठी कारवाई केली होती. या प्रकरणात आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोठेगावकर यांच्यासह सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी आणि एजंट डॉ. मनोज शिरुरे यांना सीबीआयने अटक केली होती. मुख्य संचालक सीबीआयच्या कोठडीत असतानाही संस्थेतील सुमारे 40 शिक्षकांनी गेल्या दीड महिन्यापासून खचून न जाता विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या या जिद्दीमुळेच हा निकाल शक्य झाल्याचे मत आरसीसीमधील जीवशास्त्राचे शिक्षक डॉ. राजू वानरे यांनी व्यक्त केले. पेपरफुटीच्या डागामुळे लातूरच्या ट्युशन आणि कोचिंग जगताची देशभरात मोठी बदनामी झाली होती. त्यामुळे री-नीट परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांवरही प्रचंड मानसिक दडपण होते.

# सासवडच्या श्री भैरवदेव देवस्थानच्या जमिनीचा ट्रस्टच्या बाजूने निकाल

**सासवड (दै. संध्या)**

सुमारे सात दशकांपासून प्रलंबित असलेल्या श्री भैरवदेव देवस्थानच्या जमिनीच्या वादात देवस्थान ट्रस्टला मोठा दिलासा मिळाला आहे. पुरंदर येथील तहसीलदार कार्यालयाने सर्वे क्रमांक ३०१ मधील ३ हेक्टर १९ आर जमिनीबाबतचा निकाल देवस्थान ट्रस्ट आणि भैरवकर पुजारी यांच्या बाजूने दिला आहे.

सदर जमिनीची किंमत निश्चित करण्यासाठी टकले कुटुंबीयांनी तहसीलदार न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात दोन्ही बाजूंचे पुरावे, कागदपत्रे आणि युक्तिवादांचा सखोल अभ्यास करून तहसीलदार पुरंदर यांनी संबंधित अर्ज फेटाळून लावला आणि देवस्थानच्या जमिनीवर ट्रस्टचा



सासवड : श्री भैरवदेव देवस्थानच्या जमिनीचा निकाल ट्रस्टच्या बाजूने लागल्याबद्दल आनंद व्यक्त करताना ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामस्थ.

हक्क कायम राखला. या निकालामुळे देवस्थानच्या मालमत्तेच्या संरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. हे यश 'श्री काळभैरवनाथ मंडळ ट्रस्ट ' आणि 'श्री भैरवदेव देवस्थान ट्रस्ट' यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित आहे. या कायदेशीर लढ्यात 'लेक्सकार्ट लीगल सर्व्हिसेस'च्या माध्यमातून ॲड. युवराज वारघडे आणि ॲड. अर्चना सौरभ भैरवकर यांनी प्रभावी बाजू मांडली. त्यांना ॲड. गौरी कुंजीर (माजी सभापती, पुरंदर), ॲड. पल्लवी भोसले आणि ॲड. प्रतीक तेंडुलकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या निकालाचे सासवडमधील ग्रामस्थ व भाविकांनी स्वागत केले आहे. देवस्थानचे अध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष पांडुरंग भोंगळे, चैत्री उत्सव समितीचे अध्यक्ष अजय जगताप आणि उपाध्यक्ष नितिन भोंगळे, मानकरी बापू गिरीगोसावी, राजेंद्र भैरवकर, गणेश भैरवकर , यांच्यासह रवींद्रपंत जगताप, दीपक जगताप, वैभव जगताप, बाजीराव इनामके, पोपट जगताप, ज्ञानेश्वर जगताप, विजय जगताप, सुधाकर गिरमे, उत्तम जगताप, प्रकाश जगताप, संतोष गिरमे, सर्व संचालक मंडळ व ग्रामस्थांनी या निकालाचे समाधान व्यक्त केले आहे.

# पुण्यात हलक्या सरींचे पुनरागमन; उकाड्यात दिलासा, पुढील चार दिवस पावसाची शक्यता

पुणे (दै. संध्या) : गेल्या दहा दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने अखेर शुक्रवारी (ता. १७) शहरात पुन्हा हजेरी लावली. सकाळच्या सत्रात शहराच्या उपनगरांसह विविध भागांत हलक्या स्वरूपाच्या सरी कोसळल्या. त्यामुळे गेले काही दिवस उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, वातावरणात सुखद गारवा निर्माण झाला आहे. तर पुढील तीन ते चार दिवस शहरात हलक्या पावसाची शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस झाल्यानंतर, पावसाने अचानक शहरातून काढता पाय घेतला होता. पावसाने पाठ फिरवल्यामुळे गेल्या आठवड्याभरात शहराच्या कमाल तापमानात मोठी वाढ झाली होती. दिवसाचे कडक ऊन आणि वाढलेल्या आर्द्रतेमुळे उकाड्यात भर पडली होती. मात्र, शुक्रवारी सकाळपासूनच शहरात ढगाळ वातावरण पाहायला मिळाले. त्यातच उपनगरांमध्ये पावसाच्या हलक्या सरी कोसळल्याने वातावरणात बदल जाणवला. दिवसभर आकाश बहुतांश काळ ढगाळ राहिल्याने कमाल आणि किमान तापमानात किंचित घट नोंदविण्यात आली. शुक्रवारी शहरात कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२.९ अंश सेल्सिअस इतके नोंदविले गेले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## लोहगड हत्या प्रकरण : चौकशीतून वाचण्यासाठी पाहिला ‘जपानी व्हिडिओ’

# ‘कॉन्ट्रॅक्ट किलर’ बनू शकतो प्रमुख साक्षीदार

**पुणे (दै. संध्या)**



पुणे जिल्ह्यातील लोहगड येथील बहुचर्चित केतन अग्रवाल हत्या प्रकरणात रोज नवनवीन आणि धक्कादायक खुलासे होत आहेत. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सिया गोयल आणि तिचा मित्र चेतन चौधरी यांच्या न्यायालयीन कोठडीत न्यायालयाने 14 दिवसांची वाढ केली आहे.

केतन अग्रवाल याला लोहगडावरून दरीत ढकलून त्याची हत्या केल्याचा आरोप त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा मित्र चेतन चौधरी यांच्यावर आहे. या दोघांना अटक केल्यानंतर पुणे पोलिसांकडून अत्यंत सखोल तपास सुरू असून, दररोज नवनवीन तांत्रिक आणि परिस्थितीजन्य पुरावे हाती लागत आहेत. 16 जुलै रोजी वडगाव मावळ न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे झालेल्या सुनावणीत दोघांना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिस आणि वकिलांशी संपर्क साधल्यावर त्यांनी या प्रकरणातील महत्त्वाची माहिती दिली. केतन अग्रवाल खून प्रकरणी येत्या 15 दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. वृत्तानुसार, केतनची हत्या करण्यासाठी सिया आणि चेतनने सुरुवातीला एका कॉन्ट्रॅक्ट किलरला शोधले होते. एका कॅफेमध्ये त्यांची या व्यक्तीसोबत मीटिंगही झाली होती. मात्र, केतन अग्रवाल कोण आहे हे समजल्यानंतर तो घाबरला आणि त्याने ऐनवेळी माघार घेतली. आता हीच व्यक्ती सिया आणि चेतनविरोधातील सर्वात प्रमुख साक्षीदार ठरणार आहे. या मीटिंगच्या कॅफेचे सीसीटीव्ही (CCTV) फुटेज पोलिसांनी जप्त केले आहे.

हत्येची सुपारी देण्यापूर्वी, केतनला 'स्लो पॉइझन' देऊन मारण्याचा किंवा त्याला कायमचे अपंग करण्याचा कटही या दोघांनी आखला होता. मात्र, त्यांना विष मिळाले नाही, त्यामुळे हा डाव फसल्याचे बोलले जात आहे.

पोलिसांच्या चौकशीत कसे शांत राहायचे आणि कठीण प्रश्नांची उत्तरे कशा पद्धतीने द्यायची, याचे प्रशिक्षण घेण्यासाठी सिया आणि चेतनने तब्बल दोन तासांचा एक 'जपानी व्हिडिओ' पाहिला होता. या दोघांच्या मोबाइलच्या वेब हिस्ट्रीमधून पोलिसांनी या व्हिडिओच्या लिंक्स जप्त केल्या आहेत.

मार्च 2025 मध्ये लोहगडावरच एका 21 वर्षीय विधी शाखेच्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला होता, ज्याची नोंद आत्महत्या म्हणून झाली होती. ही बातमी वाचून सियाने लोहगडाची निवड केली. तेथे सीसीटीव्ही नाही, गर्दी नसते आणि केतनला ट्रेकिंगची आवड असल्याने त्याला तिथे नेणे आणि हत्येला अपघात भासवणे सोपे जाईल, हा सियाचा कट होता, असे सांगितले जात आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, पुण्यात ते 4-5 हॉटेल्समध्ये सिया आणि चेतन नेहमी भेटत असत. एका हॉटेलच्या सीसीटीव्हीमध्ये सिया आणि चेतन एका रूममध्ये जाताना दिसतात. तास-दीड तासानंतर सिया बाहेर येते आणि त्यानंतर चेतनसोबत त्याच रूममध्ये दुसरी मैत्रीण जाताना दिसते, असा प्रकार समोर आल्याचे सांगितले जात आहे.

पुणे पोलीस आता सीसीटीव्ही फुटेज, वेब हिस्ट्री आणि हॉटेलमधील नोंदींच्या आधारावर अत्यंत भक्कम पुरावे गोळा करत आहेत. सुपारी नाकारून मागे फिरलेल्या 'त्या' व्यक्तीचा साक्षीदार म्हणून नोंदवला जाणारा जबाब, या प्रकरणात सिया आणि चेतनला कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी अत्यंत निर्णायक आणि महत्त्वपूर्ण ठरू शकतो अशी चर्चा सुरू आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पुणे ग्रामीण पोलिसांच्या चौकशीत सियाने सांगितले की तिने केतनला सांगितले होते की तिला हे नाते पुढे चालू ठेवायचे नाही. लग्नालाही नकार दिला होता.

# १८ जनावरांसह २९ लाखांचा ऐवज जप्त



**सासवड (दै. संध्या)**

## सासवड पोलिसांची कामगिरी

पुरंदर तालुक्यातील गराडे येथील ढोणे वस्तीवरून १८ दुभती जनावरे चोरणा-याला सासवड पोलिसांनी अटक केली आहे. तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत या गुन्ह्याचा छडा लावला असून, चोरीला गेलेली सर्व जनावरे आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेला टेंपो असा एकूण २९ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत फिर्यादी संतोष बापूसाहेब कटके, रा. भिवरी (ता.पुरंदर) यांच्या गराडे येथील गोठ्यातून १३ आणि १४ जुलैच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी ९ म्हशी आणि ९ गाई अशा एकूण १८ जनावरांची चोरी केली होती. या प्रकरणी सासवड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी विशेष पथक तयार केले. तपास पथकाने घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये जनावरे दोन आयशर टेंपोतून नेल्याचे दिसले. एका टेंपोच्या काचेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो असल्याचे पाहून त्या आधारे गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणातून आरोपीचा माग काढला. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी खेड तालुक्यातील गडद येथील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या गोठ्यात असल्याचे समजले. पोलिसांनी तेथे छापा टाकला असता, फिर्यादीच्या गोठ्यातील कामगार महादेव जेवर यादव (मुळ रा. बिहार) हा मिळून आला. त्याने साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी मिळाली. कोठडीत कसून चौकशी केली असता, त्याने उरलेली जनावरे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील फडतरवाडी येथे लपवल्याची माहिती दिली. पोलिसांनी तेथे धाव घेत सर्व जनावरे ताब्यात घेतली. यामध्ये सात लाख ७० हजार किंमतीच्या सात मुऱ्हा म्हशी, दोन लाख २० हजार रुपये किंमतीच्या दोन जाफराबादी म्हशी, सात लाख २० हजार रुपये किंमतीच्या ९ एच.एफ. गाई आणि १२ लाखांचा टेंपो अशा एकूण २९ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## संपादकीय

# महिला पत्रकार : लोकशाहीच्या बळकटीसाठी काळाची गरज

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. समाजातील सत्य परिस्थिती जनतेसमोर मांडणे, सत्तेला प्रश्न विचारणे, दुर्लक्षित घटकांचा आवाज बनणे आणि जनमत घडविणे ही पत्रकारितेची मूलभूत जबाबदारी आहे. परंतु या महत्त्वाच्या क्षेत्रात आजही महिलांचे प्रमाण अपेक्षेइतके वाढलेले दिसत नाही. शिक्षण, प्रशासन, उद्योग, विज्ञान, संरक्षण, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय कामगिरी करून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले असले, तरी पत्रकारितेच्या क्षेत्रात विशेषतः निर्णयक्षम पदांवर महिलांची संख्या अजूनही कमी आहे. ही परिस्थिती बदलणे ही काळाची गरज आहे.

आजच्या समाजात महिलांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. महिला सुरक्षा, आरोग्य, शिक्षण, रोजगार, कौटुंबिक हिंसा, लैंगिक शोषण, सामाजिक भेदभाव, ग्रामीण भागातील समस्या, स्वयंसहाय्यता गट, उद्योजकता आणि राजकीय सहभाग यांसारख्या विषयांना अधिक संवेदनशील आणि सखोल मांडणीची गरज असते. महिला पत्रकार या विषयांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. त्यांच्या अनुभवांमुळे आणि संवेदनशीलतेमुळे अनेक दुर्लक्षित मुद्दे समाजाच्या केंद्रस्थानी येतात. त्यामुळे पत्रकारितेची गुणवत्ता आणि व्यापकता दोन्ही वाढतात. भारतीय पत्रकारितेचा इतिहास पाहिला तर अनेक महिला पत्रकारांनी कठीण परिस्थितीत उल्लेखनीय कार्य केले आहे. संघर्षमय परिस्थितीतही त्यांनी युद्धभूमीपासून ग्रामीण भागापर्यंत आणि न्यायालयापासून संसदेपर्यंत धाडसी वृत्तांकन केले आहे. मात्र अशा यशस्वी उदाहरणांची संख्या अजूनही अपेक्षेपेक्षा कमी आहे. विशेषतः जिल्हा, तालुका आणि ग्रामीण स्तरावर महिला पत्रकारांची उपस्थिती अत्यंत मर्यादित आहे. परिणामी ग्रामीण महिलांचे प्रश्न अनेकदा मुख्य प्रवाहातील माध्यमांपर्यंत पोहोचत नाहीत. यामागे अनेक कारणे आहेत. असुरक्षित कामाचे वातावरण, अनियमित कामाचे तास, कमी मानधन, सामाजिक बंधने, कौटुंबिक जबाबदाऱ्या, रात्रीच्या वेळी वृत्तांकनाची अडचण आणि काही ठिकाणी होणारा भेदभाव यामुळे अनेक महिलांना या क्षेत्रात टिकून राहणे कठीण जाते. काही ठिकाणी महिला पत्रकारांना त्यांच्या गुणवत्तेपेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरून किंवा लिंगावरूनच मोजले जाते. ही मानसिकता बदलणे तितकेच आवश्यक आहे. माध्यम संस्थांनीही याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महिलांसाठी सुरक्षित कार्यस्थळ, समान वेतन, स्पष्ट पदोन्नतीची संधी, मातृत्व रजा, तक्रार निवारण व्यवस्था आणि नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास अधिकाधिक महिला पत्रकारिता क्षेत्राकडे आकर्षित होतील. संपादक, वृत्तसंपादक, विभागप्रमुख आणि व्यवस्थापन स्तरावरही महिलांचे प्रतिनिधित्व वाढणे आवश्यक आहे. निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला तर वृत्तांकनाचा दृष्टिकोन अधिक संतुलित आणि समावेशक बनेल. पत्रकारिता शिकविणाऱ्या महाविद्यालयांनीही विद्यार्थिनींना प्रत्यक्ष क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. प्रशिक्षण, मार्गदर्शन, सुरक्षित इंटर्नशिप आणि अनुभवी महिला पत्रकारांचे मार्गदर्शन मिळाल्यास नव्या पिढीतील अनेक तरुणी आत्मविश्वासाने या क्षेत्रात उतरू शकतील. ग्रामीण भागातील मुलींनाही पत्रकारितेच्या संधी उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे.

आजच्या डिजिटल युगात पत्रकारितेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. संकेतस्थळे, समाजमाध्यमे, दृकश्राव्य माध्यमे आणि चलतचित्र आधारित पत्रकारिता यामध्ये महिलांसाठी मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. या संधींचा उपयोग करून अधिकाधिक महिलांनी पत्रकारितेत प्रवेश केला तर माध्यमविश्व अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख होईल.

## गुरु वचन

### मजबूत मन हेच सामर्थ्य

एखाद्या शास्त्रीय नर्तिकेचा अपघातात एक पाय निकामी होऊनही तिची नृत्याची जिद्द कमी होत नाही. ती नकली पाय बसवून व्यासपीठावर नाचते. एखाद्या क्रिकेटपटूने चांगला खेळ केला तरीही त्याला संघाबाहेर जाण्याचा रस्ता दाखविला जातो. परंतु, तो हार न मानता पुन्हा संघात दाखल होतो. एका महान चित्रपट निर्मात्याच्या महत्त्वाकांक्षी चित्रपटाला दर्शकांनी नकार दिल्यानंतर तो पुन्हा एक चित्रपट निर्माण करतो आणि तो चित्रपट इतिहास घडवितो किंवा मैलाचा दगड ठरतो.

असे नेहमीच होते. कारण जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक म्हणचे कमजोर मनाचे आणि दुसरे म्हणजे मजबूत मन असलेले. कमजोर मन असणाऱ्या लोकांमध्ये संकटाचा सामना करण्याचे धाडस नसते. त्यामुळे ते अधिकधिक कमजोर होऊन तक्रार करणे, रडणे यामुळे अयशस्वी होतात. मात्र आपल्या अपयशाचे खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडण्यासाठी कारणे शोधतात.

मजबूत मन असणारे लोक असे नसतात. ते प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना करतात. टीकाकारांनी केलेली टीका त्यांचे मन बदलू शकत नाही. ते आपली हिंमत गमावत नाहीत, ते तक्रार करत नाहीत. ते प्रत्येक घटनेचा सकारात्मक बाजूने विचार करून एक दिवस यशस्वी होतात. कारण, त्यांच्यामध्ये संकटाच्याकाळी आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षा असते. ते जीवनातील प्रत्येक आव्हानाचा अधिकाधिक फायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात.

आपण यापैकी कसे आहात आणि कसे बनू इच्छिता, ते ठरविण्याचा अधिकार आपल्याला आहे. कारण, जीवनात प्रत्येकाला एक प्रश्न विचारला जातो तो म्हणजे, आपण साहसी बनू इच्छिता की भित्रे? सकारात्मक विचार करणारा कधीच भित्रा बनू शकत नाही. कारण, त्याचा स्वत:वर, जीवनावर आणि ईश्वरावर विश्वास असतो. ते उच्च विचारशक्ती आणि आत्मविश्वासाने आपले काम करतात. असे लोक आपल्यासाठी काम करतातच पण त्यांच्यामुळे देश आणि समाजाची प्रगती होत असते. असेच लोक देश आणि समाजाची अनमोल संपत्ती असतात. म्हणून नेहमी आपले मन मजबूत ठेवा. कारण, ए. पी. जे. अब्दुल कलाम, धीरूभाई अंबानी, अमिताभ बच्चन आणि सचिन तेंडूलकर या महान लोकांनी जन्म घेतला नसता तर एवढे मोठे कर्म त्याच्या हातून झाले नसते.

## उपदेशकथा

### अविश्वासाचं फळ

गावातल्या एका माणसाचा कुत्रा मोठा गुणी, ईमानी होता. सर्व गावाचं रक्षण करीत असे. काही कारणांनी त्या माणसाला आपला कुत्रा सावकाराला विकावा लागला. एक रात्री सावकाराच्या घरी चोर आला. पैशाची थैली घेऊन पळून जाणाऱ्या चोराला कुत्र्यानं पाठलाग करून धरले व त्याचा कडकडून चावा घेतला. दुसऱ्या दिवशी सावकाराचा धोतराचा सोगा तोंडात धरून ओढत त्यानं सावकाराला त्या पडक्या विहिरीपाशी नेलं. तिथं चोरानं पैशाची थैली टाकली होती. सावकाराला फार आनंद झाला. त्यानं कुत्र्याचं कौतुक केलं आणि त्याला त्याच्या पहिल्या धन्याकडे पाठवलं. त्याच्या गळ्यात एक चिठ्ठी लिहिली, 'हे जनावर अत्यंत ईमानी आहे. तुमचा आधार आहे. त्याला परत पाठवीत आहे.' कुत्रा घरधन्याकडे गेला. त्याला परत आलेला पाहताच धन्याच्या मनात अनेक शंका आल्या. त्याला वाटलं, 'हा ईमानी म्हणवणारा कुत्रा सावकाराचं दार सोडून माझ्याकडे कसा आला.' त्यानं कुत्र्याच्या डोक्यावर काठीनं प्रहार केला. ते जनावर मरून पडलं. पाहतो तो त्याच्या गळ्यात होती चिठ्ठी. ती वाचताच सारा उलगडा झाला. अविश्वास आणि उतावीळपणाचं फळ मिळालं.

कथा उपदेश : अविश्वास घातक ठरतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:बव १६:०७:०७ |
| १८जुलै २०२६ | करण:बालव |
| शनिवार | २७:४२:५९+ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:कर्क |
| आषाढ शके | चन्द्र:कन्या२३:५८:३१ |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – सफर |
| अयन– दक्षिणयन | तारीख – ३ |
| मास– आषाढ | विशेष |
| ऋतु– सौर वर्षा | सहित्यसम्राट लोकशाहीर |
| शुक्ल पक्ष | अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन |
| तिथि:पंचमी २७:४२:५९+ | नाथभुजंग महाराज |
| नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी | पुण्यतिथी – परंडा |
| १७:५९:५९ | (धाराशिव) |
| योग:वारीयन २०:४४:५८ | |

## दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०१४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 3 | 2 | | | | | 9 |
| 6 | 1 | 5 | | | 3 | | | |
| | | | | 8 | 7 | 1 | 3 | |
| | 9 | 1 | 8 | | 2 | 3 | | |
| 2 | | | 1 | | 4 | | | 8 |
| | | 7 | 5 | | 9 | 6 | 1 | |
| | 5 | 2 | 3 | 4 | | | | |
| | | | 7 | | | 5 | 4 | 3 |
| 3 | | | | | 6 | 7 | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०१३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 1 | 9 | 2 | 6 | 3 | 7 | 5 | 4 |
| 7 | 3 | 6 | 5 | 9 | 4 | 1 | 2 | 8 |
| 4 | 2 | 5 | 8 | 1 | 7 | 9 | 6 | 3 |
| 5 | 9 | 8 | 4 | 2 | 1 | 6 | 3 | 7 |
| 3 | 6 | 1 | 7 | 8 | 5 | 2 | 4 | 9 |
| 2 | 7 | 4 | 6 | 3 | 9 | 8 | 1 | 5 |
| 1 | 4 | 7 | 9 | 5 | 2 | 3 | 8 | 6 |
| 6 | 5 | 3 | 1 | 7 | 8 | 4 | 9 | 2 |
| 9 | 8 | 2 | 3 | 4 | 6 | 5 | 7 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ई.स.पू. ३९० – अलियाची लढाई – गॉल सैन्याने रोम जवळ रोमन सैन्याचा पराभव केला व नंतर रोममध्ये घुसून शहराची नासाडी केली.
- १५३६ – इंग्लंडमध्ये पोपची सद्दी संपल्याचा फतवा.
- १८३० – उरुग्वेने आपले पहिले संविधान अंगिकारले.
- १८६३ – अमेरिकन गृहयुद्ध–फोर्ट वॅग्नरची लढाई – श्यामवर्णीय सैनिकांचा युद्धात सर्वप्रथम सहभाग. ५४वी मॅसेच्युसेटस रेजिमेंटच्या झेंड्याखाली फोर्ट वॅग्नरवरील हल्ला असफल, परंतु या लढाईत श्यामवर्णीय सैनिकांची बहादुरी व धडाडी अमेरिकन लोकांना दिसली.

### राष्ट्रीय

- १८५७ – मुंबई विद्यापीठाची स्थापना.
- १९८० – 'रोहिणी' या भारतीय बनावटीच्या उपग्रहाचे श्रीहरीकोटा येथून भारतीय बनावटीच्या एसएलव्ही–३ या अग्निबाणाच्या साह्याने प्रक्षेपण.

### जन्म

- १५५२ – रुडॉल्फ दुसरा, पवित्र रोमन सम्राट.
- १८११ – विल्यम मेकपीस थॅकरे, इंग्लिश लेखक.
- १८४८ – डब्ल्यु.जी. ग्रेस, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८९० – फ्रँक फोर्ड, ऑस्ट्रेलियाचा १५वा पंतप्रधान.

### निधन

- १६२३ – पोप ग्रेगोरी पंधरावा.
- १८६३ – रॉबर्ट गुल्ड शॉ, अमेरिकेच्या ५४वी मॅसेच्युसेटस रेजिमेंटचा सेनापती.
- १८७२ – बेनितो हुआरेझ, मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
- १८९२ – थॉमस कूक, इंग्लिश प्रवास–व्यवस्थापक.
- १९६९ – शाहीर अण्णाभाऊ साठे यांचे निधन.

## : SMS :

Aaj dur se hi koi
salam kar gaya
apni yado ka
gulam kar gaya.
apni jaan girwi rakh
kar kharida tha jise.
aaj wahi hume
nilam kar gaya.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.५ | २४.९ |
| अहमदनगर | ३२.८ | २२.३ |
| अकोला | ३८.४ | २८.८ |
| अमरावती | ३७.९ | २८.७ |
| बीड | ३९.९ | २९.७ |
| भंडारा | ३८.९ | २९.६ |
| बुलढाणा | ४५.५ | ३३.२ |
| चंद्रपूर | ३९.५ | ३०.८ |
| चेन्नई | ४०.७ | ३०.९ |
| नवी दिल्ली | ४४.६ | ३६.१ |
| धुळे | ३८.४ | २६ |
| गोंदिया | ३७.७ | २६.८ |
| जळगाव | ३८.१ | २६.८ |
| कोल्हापूर | ३०.२ | २१.२ |
| लातूर | ३३.७ | २३.८ |
| मुंबई | ३६.२ | ३१.८ |
| नागपूर | ३८.२ | २६.९ |
| नांदेड | ३६.६ | २८.७ |
| नंदूरबार | ३४.४ | २५.७ |
| नाशिक | ३१.३ | २२.९ |
| पुणे | २९ | २२.४ |
| पंढरपूर | ३५.९ | २४.४ |
| सातारा | ३१.७ | २०.८ |
| सांगली | ३२.५ | २१.७ |
| सोलापूर | ३५.९ | २५ |
| वर्धा | ३९.१ | २९.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आपले कर्तृत्व आणि कुवत सिद्ध करण्याच्या संधी मिळतील.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर
व्यवहाराचा नेमका कल लक्षात घेऊन व्यवहाराची दिशा ठरविणे आवश्यक ठरेल.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा :पश्चिम
देवधर्म, पूजाअर्चा करण्यात वेळ कसा जाईल कळणार नाही. मानसिक समाधान मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:क़ाळा, शुभ दिशा: पश्चिम
कामाच्या निमित्ताने केलेला प्रवास नफा देईल. आर्थिकदृष्ट्या होणाऱ्या वाटचाली वेगवान होतील.

**मिथुन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: दक्षिण
कायदेशीर पुरावे असलेले कागदपत्र गहाळ होणार नाही याची काळजी घ्या.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा :पश्चिम
मनावर येणारी काही दडपणे दूर करण्यासाठी घरातील ज्येष्ठांचा सल्ला अवश्य घ्या.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण
घरातील सदस्यांपैकी एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस थाटामाटात साजरा कराल. आरोग्य उत्तम राहील.

**मकर :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर
नोकरदारांना वरिष्ठांचे बोलणे सहन करावे लागेल. वृद्धांनी आपले पथ्यपाणी व तब्येत सांभाळावी.


**सिंह :** शुभ रंग:भूरा, शुभ दिशा:उत्तर
वडीलधारी मंडळीनी दिलेला सल्ला घेऊन कामात केलेले बदल अफलातून यश देतील.

**कुंभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण
बेकारांना कामधंदा मिळेल. अविवाहितांचे विवाहाचे प्रश्न सुटतील. आर्थिक प्रश्न सुटतील.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर
सामाजिकदृष्ट्या मोठे कार्यविश्व उभे करू शकाल. एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल.

**मीन :** शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम
थोरामोठ्यांच्या गाठीभेटीतून बौद्धिक वर्चस्वही सिद्ध करता येईल. बेकारांना कामधंदा मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०१४



### आडवे शब्द

१. श्रीरामाचा तेरा अक्षरी मत्र
१०. शर्त, पण
१२. फायदा, कल्याण
१३. जन्म
१४. माझे
१५. रमापती
१६. डग्याची साथीदार
१७. वाळा
१८. चांदणी
२०. सीतेला पळविणारा
२२. आवड, उत्कट इच्छा
२४. धातूचा धागा
२५. नरमच्या विरुद्ध
२७. भीमाजवळचे शस्त्र
२९. उथळ पाण्याचा आवाज
३०. नवरा (ग्रा.)
३१. 'रामचरित मानस' लिहिणारे
३३. कामदेव
३४. अंजन
३६. शहराचा भाग, पेठ, पूर्ण
३८. भारवाहक
३९. थंडावा
४०. सगळीकडे
४१. चलनवलन
४२. श्रीयुत
४४. व्यापारी फायदा
४६. पाप
४७. धाव, आघात
४९. वक्र
५२. आवरण
५४. कोवळ्या दुधाचा पदार्थ
५६. 'दिव्यावरील' अंधार!
५८. लिहिताना डावीकडे सोडलेली मोकळी जागा
५९. साखळी असलेला दिवा
६०. जंगला
६२. मैत्रीण
६३. निकट, जवळ
६५. गुल होणारा दिवा!
६६. समशेर
६९. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
७०. कायदेशीर नसलेले
७२. स्त्री भूत
७३. नड, आवश्यकता
७४. डाकुंचा प्रमुख
७५. अंगरखा
७७. आंध्रमधून आलेली भटकी जमात
७८. नमस्कार
८१. झोपेचे खोबरे
८२. रात्रीचा पाऊस
८३. वस्तू निर्मितीची जागा

### उभे शब्द

१. धनको, धनवान
२. बाई, स्त्री
३.सांगलीतील पूर्वीचे संस्थान
४. सुकुमार
५. अंत:करण
७. बस्तान
८. मृत्यूचा राजा
९. मृत्यू
१०. सेपे नसलेले
११. चेष्टा
१७. अफूचे बीज
१९. संतापी
२१. आशीर्वाद
२३. मायेची सावली
२५. मनोरंजन करणारा
२६. भालप्रदेश
२७. विटी–दांडूचा खड्डा
२८. विदुराला हिणवताना वापरले गेलेले संबोधन
३१. मंजिऱ्यांचे रोपटे
३२. बायको (सं.)
३३. स्निग्ध औषध
३५. भारतीय सैनिक
३७. भविष्यकथनासाठी उपयोगी मानला जाणारा मणी
३८. मिठाईचा एक प्रकार
३९. गाणे म्हणणारा
४१. हस्तलाघव
४३. काहीजणांसाठी हे निद्रासन ठरते!
४५. बरगडी
४६. चौथा हिस्सा
४८. पहारेकरी
५०. दरोडा
५१. चर्चा, विचारविनिमय
५२. सत्व, ताकद
५३. अजून, जास्त
५५. वर–वधूची मिरवणूक
५७. जिम्मेदार
६१. समीक्षक
६२. रंग बदलणारा प्राणी
६४. गरजू, अडलेला
६७. मध्यस्थ
६८. फुकाची पायपीट
६९. सुसर
७०. हरभरा डाळीचे पीठ
७१. जेव्हा
७५. मैत्री
७६. सर्वसत्ताधीश, भूपती
७९. औषध
८०. संगीतातील पलटे

### जम्बो शब्दकोडे क्र. १०१३ चे उत्तर

आडवे उत्तर १.विदूषक ३.बातमीदार ७.पोचपावती ९.बोबडा १०.वेगवान १२.ललकारी १४.यंदा १५.चाकरचुकर १८.रतन २१.रटाळ २३. माकड २५.सरहद २९.अवसर ३१.हरामखोर ३२.कसाई ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.बाबा ४४.शकट ४६.टकटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कटोरा ५४.रक्तदान ५७अ.कसेल त्याची जमीन ६१.तडकाफडकी ६४.सम ६६.लट ६८.पदोपदी ६९.जनार्दन ७१.वाकडसर ७३.मोती ७४.कपटी ७५.गर्द ७६.रत

उभे उत्तर : १.विद्यालय २.षटकार ३.बाबत ४.तडा ५.दावेदार ६.रग ७.जनक ८.पाल चुकचुकणे ११.वाचाळ १३.रीतसर १६.रमा १७.कड १९.नर २०.खोट्या नाण्याचा आवाज २२.टालमटोला २४.घाव २६.हद्दपार २७.खारट २८.साईबाबा २९.अवस ३०.समीर ३१.हवन ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ४०.वनचर ४१.ईश ४२.बावरा ४३.कचरा ४५.कफन ४६.टक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.खट ५७.काकी ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६२.कालवा ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नग ७२.सर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गणना अर्जांच्या डिजिटायझेशनमध्ये राजकीय पक्षांनी सक्रिय भूमिका घ्यावी - जिल्हाधिकारी

पुणे (दैनिक संध्या) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमात प्रशासनाकडून सर्वतोपरी खबरदारी घेतली जात असून याद्या अचूक व परिपूर्ण तयार करण्यासाठी राजकीय पक्षांनीही सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले. विशेषतः गणना अर्जांच्या डिजिटायझेशनचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असून या प्रक्रियेत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी प्रभावी योगदान द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षांच्या साप्ताहिक बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, तहसीलदार शीतल मुळे तसेच विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, शहर प्रमुख, सचिव आणि प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. डूडी यांनी सांगितले की, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यास दोन सहाय्यक नियुक्त करण्यात आले असून जिल्ह्यात एकूण १२ हजार ६३१ सहाय्यक कार्यरत आहेत. आतापर्यंत ५५ टक्के मॅपिंगचे काम पूर्ण झाले असून ५३ टक्के गणना अर्जांचे वितरण करण्यात आले आहे. ते पुढे म्हणाले, या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा म्हणजे अर्जांचे डिजिटायझेशन जास्तीत जास्त मतदारांचे अर्ज वेळेत डिजिटाईज होण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी आठवड्यातून किमान एक दिवस बीएलओकडील याद्यांची पडताळणी करावी. पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत यादीतून वगळले जाणार नाही, यासाठी दक्षता घेणे आवश्यक आहे. ज्या मतदारांपर्यंत गणना अर्ज पोहोचणार नाही किंवा अर्ज जमा होणार नाही, त्यांचे नाव यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून अर्ज भरून घेणे आणि ते डिजिटायझेशनसाठी उपलब्ध करून देण्यात राजकीय पक्षांनी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. शहरी भागात डिजिटायझेशनचे काम अधिक गतीने पूर्ण करण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी यापुढे राजकीय पक्षांची साप्ताहिक बैठक दर बुधवारीऐवजी दर सोमवारी दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात येईल, अशी माहिती दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघात डिजिटायझेशनच्या कामासाठी ४५० विद्यार्थी मदत करणार असल्याचे सांगितले. इतर मतदारसंघांतील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### भेसळयुक्त व प्रतिबंधित अन्नसाठ्यावर कारवाई; 8.56 लाखांचा मुद्देमाल जप्त

पुणे (दैनिक संध्या) : अन्न व औषध प्रशासनाच्या 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत पुणे विभागात १४ जुलै रोजी विविध ठिकाणी कारवाई करून भेसळीच्या संशयावरून रु. ८ लाख ३३ हजार ३९१ किमतीचा अन्नसाठा तसेच रु. २२ हजार ७८९ किमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. सांगली जिल्ह्यात दूध भेसळ प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून पुण्यातील मार्केट यार्डातील एका आस्थापनातून हळद पावडर, तीळ व सोयाबीन चंकचा मोठा साठा जप्त करण्यात आला. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित आस्थापनास पुढील आदेशापर्यंत व्यवसाय बंद ठेवण्याची नोटीसही देण्यात आली आहे. ग्राहकांनी अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत किंवा स्वच्छतेबाबत तक्रारी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर नोंदवाव्यात, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाच्या सह आयुक्त (अन्न), पुणे विभाग यांनी केले आहे.

### ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी व अत्याचार पीडितांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

पुणे (दैनिक संध्या) : ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी नागरिक तसेच अनुसूचित जाती-जमातीवरील अत्याचारपीडित नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यासाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण परिसरातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. नियुक्त नोडल अधिकारी संबंधित नागरिकांच्या तक्रारी नोंदवून त्यावर आवश्यक ती कार्यवाही करतील. तसेच या नागरिकांना पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविताना अडचणी येऊ नयेत आणि त्यांच्याशी सन्मानपूर्वक वागणूक मिळावी, यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी नागरिक तसेच अनुसूचित जाती-जमातीवरील अत्याचारपीडित नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पुणे विशाल लोंढे यांनी केले आहे.

# पुण्यात एसीएमएची पहिली क्लस्टर परिषद संपन्न

पुणे (दै. संध्या)

एसीएमए मोबिलिटी फाउंडेशन तर्फे नुकतेच 'बिल्डिंग वर्ल्ड-क्लास ऑटोमोटिव्ह सप्लाय चेन- द एसीएमए वे' या संकल्पनेवर आधारित पहिल्या क्लस्टर परिषद 2026 चे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेद्वारे एसीएमए क्लस्टर मुव्हमेंटच्या 25 वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा गौरव करण्यात आला. या उपक्रमाने भारतीय ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट उद्योगात कार्यक्षमतेत सातत्याने सुधारणा, उद्योगांमधील सहकार्य आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ह्युंदाई मोटर इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण गर्ग,विशेष अतिथी म्हणून स्विच मोबिलिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मणी तसेच एसीएमएचे अध्यक्ष विक्रमपती सिंघानिया, एसीएमएचे नियुक्त अध्यक्ष श्रीराम विजी आणि एसीएमएचे सरसंचालक विनी मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.

एसीएमए चे अध्यक्ष व जेके फेनर (इंडिया) लि.चे व्यवस्थापकीय संचालक विक्रमपती सिंघानिया म्हणाले की,25 वर्षांपूर्वी एसीएमए ने एक साधा पण परिवर्तनशील निर्णय घेतला. कंपन्यांना एकमेकांपेक्षा श्रेष्ठ बनण्यास सांगण्यापेक्षा एकमेकांच्या सहकार्याने अधिक सक्षम बनविण्याचे आवाहन केले. या विचारातूनच एसीएमए क्लस्टर मुव्हमेंटचा जन्म झाला व हे कालांतराने सहकार्य,नवे मापदंड आणि निरंतर सुधारणेच्या संस्कृतीत विकसित झाले.

उद्योगाच्या प्रगतीवर प्रकाश टाकत ते म्हणाले की,भारतीय ऑटो कॉम्पोनंट उद्योगाने आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 7.6 लाख कोटी रूपयांची उलाढाल ओलांडली असून निर्यात 24 अब्ज डॉलरपर्यंत पोहचली आहे. ही कामगिरी भारतीय उत्पादनावरील वाढता जागतिक विश्वास दर्शवत आहे.मात्र नेतृत्व टिकून ठेवण्यासाठी अभियांत्रिकी,उत्पादन उत्कृष्टता,गुणवत्ता,अभिनवता आणि मनुष्यबळात सातत्यपूर्ण गुंतवणूकीची आवश्यकता असेल.



एसीएमएचे नियुक्त अध्यक्ष व ब्रेक्स इंडिया प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक श्रीराम विजी म्हणाले की,भारत जागतिक उत्पादनात आपले स्थान मजबूत करत असताना जागतिक दर्जाच्या पुरवठा साखळ्या तयार करण्यासाठी उद्योग,सरकार आणि तंत्रज्ञान संस्थांमध्ये अधिक जवळच्या सहकार्याची आवश्यकता असेल.एसीएमए क्लस्टर मुव्हमेंट उत्पादकांना विशेषत: एमएसएमई उद्योगांना गुणवत्ता,डिजिटलायझेशन आणि सातत्यपूर्ण क्षमता विकासाद्वारे स्पर्धात्मकता सुधारण्यास मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

या परिषदेत भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाचे (एमएसएमई) सहसचिव (प्रशासन व तंत्रज्ञान) विनम्र मिश्रा यांचे बीजभाषण झाले. तसेच टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्स, टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी, व्हीई कमर्शियल व्हेईकल्स, जेएसडब्ल्यू मोटर्स, टीव्हीएस मोटर कंपनी आणि कमिन्स इंडिया यांच्या खरेदी व धोरण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतलेल्या विशेष परिसंवादात जागतिक स्तरावर स्पर्धात्मक ऑटोमोटिव्ह पुरवठा साखळीच्या भविष्यासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली.

रौप्य महोत्सवी सोहळ्याचा एक भाग म्हणून एसीएमए ने क्लस्टर मुव्हमेंटच्या 25 वर्षांच्या प्रवासावर आधारित इम्पॅक्ट ची विशेष आवृत्ती प्रकाशित केली.तसेच उत्पादन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी आणि निरंतर सुधारणेसाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या क्लस्टर स्टार परफॉर्मर कंपन्यांचा गौरव केला.

एसीएमए (द ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया) चे सरसंचालक विनी मेहता म्हणाले की,देशांतर्गत असलेली भक्कम मागणी,तंत्रज्ञानातील निरंतर गुंतवणूक आणि जागतिक ग्राहकांचा विश्वास यांच्या जोरावर वित्तीय वर्ष 2026 मध्ये भारताच्या ऑटोकॉम्पोनंट उद्योगाची लवचिकता आणि क्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. जागतिक पुरवठा साखळ्यांमध्ये बदल होत असताना एक विश्वासार्ह उत्पादन भागीदार म्हणून भारत आपली स्थिती अधिक बळकट करत आहे.एसीएमए क्लस्टर मुव्हमेंट हे सातत्याने सिध्द करत आहे की,परस्पर सहकार्य आणि निरंतर क्षमता सुधारणा ही स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी तसेच जागतिक दर्जाच्या वाहन पुरवठा साखळ्या उभारण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

पुण्यात ही परिषद होणे म्हणजे वाहन उत्पादन क्षेत्रात योगदान देत असलेल्या शहराचे महत्त्व अधोरेखित होते. चार हजारांहून अधिक ऑटोमोटिव्ह आणि ॲन्सिलरी उद्योगांचे केंद्र असलेले पुणे आज अभियांत्रिकी कौशल्य, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान आणि उद्योगांमधील सहकार्याच्या माध्यमातून क्षमता विकासाचे प्रमुख केंद्र बनले आहे. इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) तंत्रज्ञानातील झपाट्याने होत असलेली प्रगती, जागतिक दर्जाच्या संशोधन व विकास तसेच चाचणी क्षमता आणि इंडस्ट्री 4.0 आधारित उत्पादन पद्धतींचा अवलंब यामुळे पुणे शहर भारताच्या ऑटोमोटिव्ह सप्लाय चेन क्षेत्रातील परिवर्तनाला गती देत आहे.

## महाराष्ट्र ग्रामविकास परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी भाग्यश्री विवेक ठाकरे यांची नियुक्ती

पुणे (दै. संध्या)

ग्रामगौरव फाउंडेशन या राज्यस्तरीय संस्थेशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र ग्रामविकास परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी भाग्यश्री विवेक ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण विकास क्षेत्रातील त्यांची कार्यतत्परता, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा निर्णय जाहीर करण्यात आला. परिषदेचे संस्थापक प्रणेते विवेक ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक कार्याध्यक्ष सुभाष मराठे यांनी भाग्यश्री ठाकरे यांच्या ग्रामीण विकास क्षेत्रातील अभ्यास, कार्याची आवड आणि संघटन कौशल्याचा गौरव करत त्यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली.



महाराष्ट्र ग्रामविकास परिषद ही राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद यांच्या समन्वयातून ग्रामीण विकासासाठी कार्यरत असलेली संघटना आहे. शासनाच्या विकासाभिमुख धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, शासन निर्णय, परिपत्रके आणि विविध कल्याणकारी योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविणे तसेच पंचायतराज व्यवस्थेतील सर्व घटकांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी परिषद सातत्याने कार्यरत आहे.

या पदाच्या माध्यमातून राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींशी संबंधित धोरणात्मक विषयांवर समन्वय साधणे, तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, पाणीपुरवठा कर्मचारी, संगणक परिचालक, रोजगार हमी योजनेचे रोजगार सहाय्यक आणि पंचायतराज व्यवस्थेतील सर्व घटकांच्या अडीअडचणी, प्रलंबित प्रश्न व रास्त मागण्यांसाठी संघटनात्मक पातळीवर प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

राज्यभर महाराष्ट्र ग्रामविकास परिषदेचे जाळे अधिक सक्षम करत ग्रामीण विकासाला नवी दिशा देण्यासाठी भाग्यश्री ठाकरे यांच्या नेतृत्वाचा निश्चितच मोलाचा वाटा उरेल, असा विश्वास नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आला आहे. भाग्यश्री विवेक ठाकरे यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व ग्रामविकास क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## अंकशास्त्राचा आणखी एक अचूक संकेत: - फिफा विश्वचषकात सूर्याच्या ऊर्जेचा प्रभाव स्पष्ट!

पुणे (दै. संध्या)

२०२६ हे अंकशास्त्रानुसार 'क्रमांक- १' म्हणजे १ या अंकाचा प्रभाव असलेले वर्ष असून त्यावर सूर्याचा प्रभाव आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच अंकशास्त्र तज्ज्ञ श्वेता जुमानी यांनी सांगितले होते की, या वर्षात सूर्याची ऊर्जा जगभरातील महत्त्वाच्या घटनांमध्ये ठळकपणे दिसून येईल. सूर्याशी संबंधित पिवळा, नारिंगी आणि सोनेरी रंग तसेच सूर्य किंवा सिंहाचे प्रतीक असलेल्या देशांना यश, मान-सन्मान आणि विशेष स्थान मिळण्याची शक्यता अधिक असेल.



सिंह (Leo) ही सूर्याची स्वतःची रास आहे. नेतृत्व, सत्ता, धैर्य, आत्मविश्वास, कीर्ती आणि विजय हे सिंह राशीचे प्रमुख गुण आहेत. 'क्रमांक १'च्या वर्षात हे गुण अधिक प्रभावीपणे कार्यरत होतात. जुलै महिन्याच्या माझ्या भाकितांमध्येही मी याचा उल्लेख केला होता. तसेच, आरसीबीच्या विजेतेपदाच्या वेळीही सिंहाचे प्रतीक आणि सूर्याची ऊर्जा स्पष्टपणे दिसून आली होती.

आता हीच ऊर्जा फिफा विश्वचषकातही पाहायला मिळत आहे. स्पर्धेतील ४८ संघांपैकी फक्त ८ संघांच्या ध्वज, चिन्ह किंवा राष्ट्रीय प्रतीकांमध्ये सूर्य किंवा सिंहाचे ठळक प्रतिनिधित्व आहे. विशेष म्हणजे त्या ८ पैकी स्पेन, इंग्लंड आणि अर्जेंटिना हे ३ संघ उपांत्य फेरीत पोहोचले. त्यानंतर स्पेनने फ्रान्सवर विजय मिळवत अंतिम फेरीत स्थान निश्चित केले. हे दर्शवते की २०२६ मध्ये सूर्याची ऊर्जा नेतृत्व, यश आणि सर्वोच्च स्थानाकडे नेणारी ठरत आहे.

अंकशास्त्र म्हणजे फक्त आकड्यांचा अभ्यास नाही. ते वेळ, ऊर्जा आणि घटनांमध्ये वारंवार दिसणाऱ्या संकेतांचा अभ्यास आहे. फिफा विश्वचषकातील हा योगायोग नसून, सूर्याशी संबंधित नेतृत्व, प्रसिद्धी आणि विजयाची ऊर्जा या वर्षात सातत्याने प्रकट होत असल्याचा आणखी एक रंजक संकेत मानला जाऊ शकतो.

## अजित कडकडेंच्या भावस्पर्शी आवाजातील 'श्रीपाद वल्लभ दिगंबरा' गीत सप्तसूर म्युझिकवर प्रदर्शित

पुणे (दै. संध्या)

दत्तभक्तांच्या मनात श्रद्धा आणि भक्तीचा दिव्य अनुभव जागवणारे "'श्रीपाद वल्लभ दिगंबरा'" हे भक्तिगीत नुकतेच 'सप्तसूर म्युझिक' यूट्यूब चॅनेलवर प्रदर्शित झाले आहे. "कृतार्थ झाला जन्म पाहुनी सगुण रूप साकार, दत्त दत्त स्मरता तरला ब्रम्हांडाचा भार" या ओळींमधून दत्तगुरूंच्या कृपेचा आणि त्यांच्या सगुण स्वरूपाच्या दर्शनाचा भावपूर्ण आविष्कार या गीतातून अनुभवायला मिळतो. तब्बल 12 वर्षांनी सुप्रसिद्ध गायक अजित कडकडे यांचे नवीन गाणे अल्बम साँगमधून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे.

सप्तसूर म्युझिकने या गाण्याची निर्मिती केली असून साईनाथ राजाध्यक्ष आणि बीना राजाध्यक्ष हे या गाण्याचे निर्माते आहेत. गीतकार साई दळवी यांनी शब्दरचना केली असून संगीत मनोहर गोलांबरे यांचे आहे. संगीत संयोजन निषाद गोलांबरे यांनी केले आहे. तबल्यावर शुभम सुतार, पखवाजावर तेजस मोरे यांनी साथ दिली असून मयुरेश, गीता गोलांबरे आणि बीना राजाध्यक्ष यांच्या कोरसने गीताला अधिक भक्तिमय स्वरूप प्राप्त झाले आहे.

दत्तगुरू हे श्रद्धा, संयम, ज्ञान आणि करुणेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या नामस्मरणाने भक्तांच्या जीवनातील संकटे दूर होऊन मनाला शांतता आणि आत्मिक समाधान लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. हीच भक्तिभावाची अनुभूती 'श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या गीतातून प्रभावीपणे व्यक्त करण्यात आली आहे. ज्येष्ठ आणि ख्यातनाम गायक पंडित अजित कडकडे यांच्या भारदस्त, भावस्पर्शी आणि



भक्तिरसपूर्ण आवाजाने हे गीत अधिकच प्रभावी बनले आहे. त्यांच्या गायकीतील भक्तिभाव प्रत्येक श्रोत्याच्या मनाला स्पर्श करतो आणि दत्तभक्तीची अनुभूती अधिक गहिरी करतो.

नेहमीच श्रोत्यांच्या आवडीनिवडी ओळखून दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण गीते सादर करणारे सप्तसूर म्युझिक भक्तिगीते, भावगीते, मराठी गीते आणि विविध संगीतप्रकारांमधून सातत्याने रसिकांचे मनोरंजन करत आहे. प्रत्येक निर्मितीत गुणवत्ता, आशय आणि संगीताची समृद्धता जपत श्रोत्यांसाठी वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न सप्तसूर म्युझिककडून केला जात असल्याचे निर्माते साईनाथ राजाध्यक्ष आणि बीना राजाध्यक्ष यांनी सांगितले.

दत्तभक्तांसह संगीतप्रेमींसाठीही 'श्रीपाद वल्लभ दिगंबरा' हे गीत एक आध्यात्मिक आणि संगीतमय पर्वणी ठरणार आहे.

# नाबार्ड, महाराष्ट्राचा ४५ वा स्थापना दिन पुण्यात उत्साहात साजरा; महिला शेतकऱ्यांचा गौरव

पुणे (दै. संध्या)


नाबार्ड महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालयाने १६ जुलै २०२६ रोजी पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे आपला ४५ वा स्थापना दिन उत्साहात साजरा केला. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष – २०२६ निमित्त आयोजित या कार्यक्रमातून सर्वसमावेशक, शाश्वत आणि हवामान बदलास तोंड देणाऱ्या ग्रामीण विकासाप्रती नाबार्डची वचनबद्धता अधोरेखित करण्यात आली.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे कृषिमंत्री मा. श्री. दत्तात्रय विठोबा भरणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. राज्यातील महिला शेतकरी, महिला-प्रवर्तित शेतकरी उत्पादक कंपन्या (FPOs), स्वयं-सहाय्यता बचत गट (SHGs), प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) तसेच ग्रामीण उद्योजक यांचा ग्रामीण परिवर्तनातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरव करण्यात आला. कार्यक्रमास श्री. जयकिश, मुख्य महाव्यवस्थापक व प्राचार्य, CAB, पुणे; श्री. विवेक नचाणे, महाव्यवस्थापक व निमंत्रक, SLBC, महाराष्ट्र; डॉ. भरत काकडे, अध्यक्ष, BAIF; तसेच श्री. विद्याधर अनास्कर, प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक उपस्थित होते. डॉ. ए. व्ही. भवानी शंकर, मुख्य महाव्यवस्थापक, नाबार्ड, महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालय यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

यावेळी "Empowering Rural Maharashtra: NABARD 2025-26" या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच चंद्रपूर जिल्ह्यात महिलांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या नाबार्ड समर्थित बॅकयार्ड पोल्ट्री उपजीविका प्रकल्पावरील माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

कृषिमंत्र्यांनी अधोरेखित केली राज्य शासनाची शेतकरी कल्याणाची बांधिलकी मा. श्री. दत्तात्रय भरणे यांनी महाराष्ट्रातील शेतकरी व सहकार क्षेत्राच्या विकासासाठी गेल्या ४५ वर्षांपासून नाबार्डने दिलेल्या योगदानाचे कौतुक करत महिला शेतकऱ्यांना "शेतीचा कणा" असे संबोधले.

राज्य शासनाच्या शेतकरी-केंद्रित उपक्रमांचा उल्लेख करत त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना अंतर्गत ₹२ लाखांपर्यंत कर्जमाफी व नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ₹५०,००० प्रोत्साहन, ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांसाठी मोफत वीज, नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत ५ लाख हेक्टरचे उद्दिष्ट, एक कोटीहून अधिक शेतकऱ्यांना AgriStack डिजिटल ओळख, महाविस्तार-AI व वसुधा यांच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कृषी सल्ला तसेच पशुधन उद्योजक



आणि मत्स्य संपदा योजना यांद्वारे वाढीव उपजीविकेच्या संधी यांचा विशेष उल्लेख केला.

ते म्हणाले की, प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा २०२३-२४ मधील ₹६.४० लाख कोटींवरून २०२५-२६ मध्ये ₹९.२० लाख कोटींवर पोहोचला आहे. तसेच कृषी कर्जवाटप ₹१.५४ लाख कोटींवरून ₹१.९३ लाख कोटींवर वाढले असून, विशेषतः लघु व सीमांत शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड (KCC) चा विस्तार करण्याचे आवाहन त्यांनी बँकांना केले.

महिला सक्षमीकरणाचा उल्लेख करताना त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणि उमेद अभियान यांचा उल्लेख केला. या माध्यमातून राज्यातील ५० लाखांहून अधिक महिला स्वयं-सहाय्यता गटांतील सदस्यांना ₹५०,००० कोटींपेक्षा अधिक कर्जवाटप करून त्यांना 'लखपती दीदी' बनविण्याचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नाबार्डने उमेद, MAVIM आणि महिला शेतकरी उत्पादक कंपन्या (Women FPCs) यांच्याशी अधिक दृढ सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. राज्याच्या 'विकसित महाराष्ट्र २०४७' या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था उभारण्याचे लक्ष्य ग्रामीण भाग, शेती आणि सहकार क्षेत्राच्या बळावरच साध्य होईल, असे प्रतिपादन केले.

डॉ. ए. व्ही. भवानी शंकर यांनी सांगितले की, २०२५-२६ हे वर्ष नाबार्ड महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक ठरले असून, व्यवसाय सहाय्य व पुनर्वित्ताची रक्कम ₹३९,३८० कोटींवर पोहोचली आहे. राज्य शासनाला थेट पायाभूत सुविधा विकासासाठी सुमारे ₹५,६०० कोटींचे सहाय्य देण्यात आले असून, विविध विकासात्मक व अनुदानाधारित उपक्रमांसाठी ₹३७.७२ कोटींची मदत करण्यात आली.

त्यांनी PACS चे संगणकीकरण, बहुउद्देशीय PACS, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPOs), हवामान अनुकूल शेती, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन तसेच महिलांच्या नेतृत्वाखालील ग्रामीण उद्योगांना नाबार्डकडून सातत्याने मिळणाऱ्या पाठबळाची माहिती दिली. महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि ग्रामीण संस्थांचे बळकटीकरण हे महाराष्ट्रातील 'विकसित भारत @२०४७' या नाबार्डच्या धोरणाचे प्रमुख केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सौ. स्मृती भगत, महाव्यवस्थापक यांनी स्वागतपर भाषण केले. तर श्री. अविनाश पी. सेवलकर, महाव्यवस्थापक, नाबार्ड महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालय यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ग्रंथसंपदेचे प्रहरी रमेश शिंदे यांचा नागरी सत्कार उत्साहात संपन्न

## मान्यवरांकडून कृतज्ञतेची मानवंदना

**मुंबई (दै. संध्या) :**

ज्येष्ठ साहित्यिक, दुर्मिळ ग्रंथसंग्राहक आणि आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक रमेश शिंदे यांच्या ९३ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित नागरी सत्कार सोहळा श्रावस्ती बुद्ध विहार, मोतीलाल नगर येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या दिमाखात संपन्न झाला. विविध सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याला शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून शिंदे यांच्या ज्ञानसाधनेला आणि आयुष्यभराच्या कार्याला कृतज्ञ मानवंदना अर्पण केली. कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक अर्जुन डांगळे, माधवीताई राणे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. आशालता कांबळे, ज्येष्ठ पत्रकार युवराज मोहिते, संजीव साबडे, विजय सुरवाडे, श्रीकांत तळवटकर, राजकुमार अहिरे, मल्हारी भिसे, स्वप्नील निरभवने, बुद्धभूषण शिंदे, गौरव राणे, संतोष येवले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ॲड. प्रदीप साळवी यांनी भूषविले. प्रास्ताविक व खुमासदार शैलीतील सूत्रसंचालन श्रीधर शेलार यांनी केले, तर समारोप व आभारप्रदर्शन संजय अहिरे यांनी केले. प्रमुख वक्ते अर्जुन डांगळे यांनी आपल्या भाषणात रमेश शिंदे यांच्या सात दशकांहून अधिक काळाच्या साहित्यिक, वैचारिक आणि सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला.



आंबेडकरी चळवळीतील त्यांचे योगदान, दुर्मिळ ग्रंथसंपदेचे जतन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी केलेले अविरत कार्य आणि नव्या पिढीपर्यंत ज्ञानाचा वारसा पोहोचविण्याची त्यांची तळमळ यांचा गौरव करत, "रमेश शिंदे यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे," असे ते म्हणाले. ज्येष्ठ पत्रकार युवराज मोहिते यांनी आपल्या मनोगतात शिंदे यांच्या ग्रंथसंपदेचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले, "सर्वांच्याच घरात पुस्तके असतात; मात्र रमेश शिंदे यांच्या घरात पुस्तकांचे नव्हे, तर इतिहासाचे जिवंत ग्रंथालय आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात माहिती सहज उपलब्ध होते; परंतु तिची सत्यता पडताळण्यासाठी विश्वसनीय संदर्भांची गरज असते. असे विश्वासार्ह ज्ञानस्रोत म्हणजे रमेश शिंदे यांच्यासारखे ग्रंथसंग्राहक."

प्रा. आशालता कांबळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, बाबासाहेबांवरील दुर्मिळ दस्तऐवज, पत्रव्यवहार आणि ग्रंथ शिंदे यांनी लेकराप्रमाणे जपले आहेत. संशोधक, लेखक आणि अभ्यासकांना ते निःस्वार्थपणे संदर्भ उपलब्ध करून देतात. भौतिक संपत्तीपेक्षा ज्ञानाची संपत्ती जपणाऱ्या अशा व्यक्तिमत्त्वाचा आदर्श समाजाने जतन केला पाहिजे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

अध्यक्षीय भाषणात ॲड. प्रदीप साळवी यांनी रमेश शिंदे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच गोरेगाव परिसरातील सामाजिक कार्य, सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा त्यांचा स्वभाव आणि समाजाशी असलेली त्यांची जिव्हाळ्याची नाळ अधोरेखित केली. तसेच, त्यांच्या कार्यावर लवकरच गौरवग्रंथ प्रकाशित व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना रमेश शिंदे भावूक झाले.

नागरिकांनी व्यक्त केलेले प्रेम, सन्मान आणि आपुलकी पाहून त्यांच्या भावना अनावर झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आठवणी सांगताना त्यांचे डोळे पाणावले. दुर्मिळ पुस्तके विकत घेण्यासाठी आयुष्यभर केलेली काटकसर, आर्थिक अडचणींवर मात करत जपलेली ग्रंथसंपदा आणि संशोधनासाठी वाहिलेले आयुष्य यांचा उल्लेख करताना त्यांना गहिवरून आले. यावेळी त्यांनी आपल्या मनातील एक खंतही व्यक्त केली. ते म्हणाले, "माझ्या ग्रंथसंपदेची आणि संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जाते.

परदेशातील संशोधक आणि अभ्यासक संदर्भासाठी माझ्याकडे येतात. मात्र मी ज्या गोरेगाव परिसरात राहतो, त्या परिसरातील एकही व्यक्ती माझी ग्रंथसंपदा पाहण्यासाठी किंवा तिचा अभ्यास करण्यासाठी कधी आली नाही. ही बाब मला कायमची खंत देऊन जाते." त्यांच्या या मनोगताने उपस्थित काही क्षण स्तब्ध झाले. यावेळी रमेश शिंदे यांचा शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या ज्ञानतपस्येचा गौरव करत त्यांना शतायुषी होण्याच्या शुभेच्छा दिल्या.

अल्पावधीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे हा सोहळा केवळ वाढदिवसाचा कार्यक्रम न ठरता ज्ञान, साहित्य, सामाजिक बांधिलकी आणि आंबेडकरी विचारांचा उत्सव ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल रमेश शिंदे अभिष्टचिंतन सत्कार समितीने सर्व मान्यवर, सहकारी आणि उपस्थित नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच, येत्या प्रत्येक वर्षी रमेश शिंदे यांचा वाढदिवस अशाच उत्साहात आणि वैचारिक वातावरणात साजरा करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मनोहर जाधव, सुधाकर रूपवते, शैलेश बनकर,विजय गांगुर्डे,अजय घोक्षे,प्रशांत कांबळे ,संतोष घाडी,रवींद्र थोरात, अविनाश कांबळे,विनोद कापडणे,राजेंद्र जाधव यांच्यासह समितीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सर्वधर्म समभावाचा संदेश देणारे कुंजीरवाडीचे माजी सरपंच दादा तुपे यांचे निधन



लोणी काळभोर (दैनिक संध्या) : कुंजीरवाडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा श्रीराम प्रासादिक दिंडीचे संस्थापक दादा उर्फ बबनराव रामचंद्र तुपे (वय.७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. बबनराव तुपे हे कुंजीरवाडीचे सरपंच असताना, त्यांनी अनेक विकासाभिमुख कामे केली. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी गावाच्या विकासासाठी अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध करून गावाचा कायापालट केला. आपल्या परंपरा जपण्यासाठी त्यांनी श्रीराम प्रासादिक दिंडीची स्थापना केली. या दिंडीच्या माध्यमातून त्यांनी गावातील नागरिकांना एकत्र आणले व सर्वधर्म समभावाचा संदेश देऊन भक्तीचा मार्ग सांगितला. त्यांच्या निधनाने धार्मिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर कुंजीरवाडी येथील स्मशानभूमीत गुरुवारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कुंजीरवाडीचे माजी सरपंच सचिन तुपे व माजी सरपंच सुनीता धुमाळ यांचे ते वडील तर श्रीनाथ पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप धुमाळ यांचे ते सासरे होते.


## जाहीर नोटीस

प्रति,

सर्व लोकांस विशेषतः गांव पारगाव तर्फे मढ, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस,

आमचे आशील १) श्रीमती. बबन चकवे २) श्रीमती. आशा बबन चकवे, ३) श्री. नवनाथ बबन चकवे, ४) श्री. स्वप्नील बबन चकवे, सर्वजण रा. पारगाव तर्फे मढ, ता. जुन्नर, जि. पुणे आज समक्ष जुन्नर यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते येणे प्रमाणे

१) मिळकतिचे वर्णन : तु. व जि. पुणे, पो. तु. दु. नि. नारायणगांव, ता. व प. स. जुन्नर जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत पारगाव तर्फे मढचे हद्दीतील मिळकत.

त्यांसी वर्णन :-

जुने सर्वे नंबर प्रमाणे वर्णन :-

| जुना स.नं. | क्षेत्र एकर गुंठे. | आकार रू. आणे पै. |
|---|---|---|
| ७२/३. | ००.३४. | ०. ६. ६ |

चालु गटवारी प्रमाणे वर्णन :-

| ग.नं. | क्षेत्र. हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ७५/३. | ००.३४. | ००.४१ |

येणे प्रमाणे वर्णनाची भातगद्दी तसेच गवतपड स्वरूपाची शेतजमीन त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह.

२) वर नमूद जमिनीमध्ये पारगाव तर्फे मढ येथील सखाराम कृष्णा चकवे हे कूळ हक्काने जमीन वहिवाटीत असत. उपरोक्त जमिनीमधील सखाराम व त्याचे वाली-वारसांचा हक्क व ताबा वहिवाट केव्हाही नष्ट झाला नाही व सखाराम याचे कुटुंबाकडून केव्हाही उपरोक्त जमिनीचा ताबा हस्तांतरीत झालेला नाही. त्यामुळेच सदरील जमिनीमध्ये सखाराम कृष्णा चकवे याचे वाली-वारसांचे आपापसातील झालेल्या वाटपानुसार वर नमूद जमीन आमचे आशील गेली अनेक वर्षानुवर्षे मेहनत - मशागत करून उत्पन्न घेत आलेले असून आजही सदरील जमीन आमचे आशिलांचे प्रत्यक्ष ताबेवहिवाटीस आहे.

३) वर नमूद जमिनीमध्ये रामभाऊ मारूती उर्फ मालजी कोंडे अगर १) शांताबाई महादू बोऱ्हाडे, २) सोपान रघुनाथ कोंडे, ३) वृशाल श्रीहरी कोंडे, ४) कमल दत्तात्रय जगताप, ५) गिताबाई श्रीहरी कोंडे, ६) वृषाली पंकज वर्षे, ७) सिंधुबाई श्रीहरी कोंडे, ८) हरिश्चंद्र रंगनाथ कोंडे, ९) संतोष रंगनाथ कोंडे, १०) रंजना बारकू मुळे, ११) मंगल जयदास गावडे, १२) आशा बबन हांडे, १३) वत्सलाबाई रंगनाथ कोंडे, १४) यशवंत ज्ञानदेव कोंडे, १५) मुनेश ज्ञानदेव कोंडे, १६) निलेश ज्ञानदेव कोंडे, १७) मनिषा रमेश चासकर, १८) राधाबाई ज्ञानदेव कोंडे, सर्वजण रा. धामणखेल, ता. जुन्नर, जि. पुणे एव्हढेच नव्हेतर अन्य इसमांचाही रामभाऊचे हयातीपासूनच आजतागायत ताबा वहिवाट नव्हता व आजही नाही. असे असताना काही अज्ञात इसम गावचे हक्कनोंदणीस झालेल्या पोकळीस्त नोंदीचे आधारे वर नमूद जमिनीचे संदर्भात काही अनाधिकाराचा, बिनताब्याचा व्यवहार केवळ आर्थिक, अनुचीत लाभ उठविणेचे हेतुने करणेचे प्रयत्नात असून तशी त्यांचेबरोबर काही लोक बोलणी करीत असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. तसले कुठलेही व्यवहार हे आमचे आशिलांचे उपरोक्त मिळकतीमधील कायदेशीर हक्कावर व ताब्यावर कायद्यानेच बंधनकारक ठरणार नाहीत व संबंधीत व्यक्तीस वर नमूद मिळकतिची मालकी एव्हढेच नव्हेतर ताबाही मिळणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे.

कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस

दि. १३/०७/२०२६

सही/-
श्री. कौस्तुभ पी. कर्पे
बी.एस.एल.एल.एल.एम.
ॲडव्होकेट
"आशियाना", "ईशान", ॐ शक्तीनगर,किल्ले शिवनेरी पायथा, जुन्नर, जि. पुणे महा./१८३४/२०१४
मो. ८७६७०९३८६२


## प्रा. क्रांती पाटील यांना पीएचडी

**सासवड (दै. संध्या) :**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत ट्रिनिटी ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील प्रा. क्रांती पाटील यांना पीएचडी पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. प्रा. क्रांती पाटील यांनी "डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ मिमो अँटेना फॉर सब-6 जीएचझेड 5 जी ॲप्लिकेशन इन मोबाईल डिव्हाइसेस" या विषयावर आपले संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट रिसर्च येथे त्यांची मौखिक परीक्षा पार पडली. या संशोधनासाठी त्यांना डॉ. डी. एम. यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रा. पाटील या गेल्या १३ वर्षांपासून ट्रिनिटी ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक के. जे.



जाधव, प्राचार्य डॉ. रूपेश पाटील, विभागप्रमुख डॉ. दिप्ती कुलकर्णी, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या यशात त्यांच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. प्रा. क्रांती पाटील या पुरंदर हायस्कूलचे माजी उपमुख्याध्यापक आर. आर. पाटील आणि शिक्षिका एम. आर. पाटील यांच्या स्नुषा आहेत. त्यांच्या या यशाचे सासवड परिसर व शिक्षण क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## कॅलिफोर्निया बदाम : कुटुंबाची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पावसाळा सुरू झाला आहे आणि त्यासोबतच हंगामी आजार, सर्दी, ताप आणि खोकल्याचे नेहमीचे प्रमाणही वाढते, ज्यामुळे संपूर्ण कुटुंबाच्या रोगप्रतिकारक शक्तीची कसोटी लागते. ऋतूतील बदलांचा परिणाम लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत घरातील प्रत्येकावर होऊ शकतो, त्यामुळे पूर्वतयारी ठेवणे अधिक महत्त्वाचे ठरते. यासाठी संतुलित आहार हा सर्वात सोपा मार्ग आहे. कॅलिफोर्निया बदाम, संपूर्ण धान्ये तसेच वनस्पती आणि प्राणिज प्रथिनांसारखे रोगप्रतिकारक शक्तीला पूरक सुपरफूड्स आणि सक्रिय जीवनशैली यांची जोड संपूर्ण पावसाळ्यात मजबूत रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करण्यास मदत करते.



कॅलिफोर्निया बदाम हे असेच एक सुपरफूड आहे, जे नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध असून त्यामध्ये झिंक, तांबे आणि लोह यांसह 24 पोषक घटक असतात. हे पोषक घटक रोगप्रतिकारक शक्तीच्या कार्याशी संबंधित आहेत. पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती अधिक महत्त्वाची ठरत असल्याने, तज्ज्ञ आणि अभिनेत्री सोहा अली खान यांनी पोषक घटकांनी समृद्ध साधे अन्नपदार्थ या ऋतूमध्ये एकूण आरोग्याला कसा आधार देऊ शकतात, याविषयी माहिती दिली आहे. पावसाळ्यात निरोगी राहण्यासाठी काय करावे, याविषयी भाष्य करताना न्यूट्रिशन आणि वेलनेस कन्सल्टंट शीला कृष्णस्वामी म्हणाल्या, “पावसाळा हा असा ऋतू आहे, जेव्हा आपल्या शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीची सर्वाधिक परीक्षा होते. आहारातील छोट्या आणि सातत्यपूर्ण सवयी तुमची रोगप्रतिकारक शक्ती किती सक्षम राहते, यामध्ये मोठा फरक घडवू शकतात. दररोजच्या आहारात बदामांचा समावेश करणे ही अशीच एक सोपी सवय आहे. बदामांमध्ये जीवनसत्त्व ई आणि अनेक पॉलीफेनॉल्ससह 24 पोषक घटक असतात. हे दोन्ही अँटिऑक्सिडंट्स म्हणून कार्य करतात आणि रोगप्रतिकारक शक्तीला आधार देतात.”

मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्लीच्या डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दार म्हणाल्या, “पावसाळा हा असा ऋतू आहे, जेव्हा आपल्या रोगप्रतिकारक शक्तीकडे सर्वाधिक लक्ष देण्याची गरज असते. ऋतूतील बदलांमुळे संसर्गाचा धोका वाढू शकतो आणि अशा वेळी आपण काय खातो, याची स्वतःचे संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका असते. मी नेहमी माझ्या क्लायंट्सना रोगप्रतिकारक शक्तीला आधार देणाऱ्या पोषक घटकांनी समृद्ध संतुलित आहार घेण्याचा सल्ला देते.

संपूर्ण धान्ये, कमी चरबीयुक्त प्रथिने आणि कॅलिफोर्निया बदाम हे माझ्या प्रमुख शिफारसींपैकी काही आहेत. कॅलिफोर्निया बदाम हे नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध असून त्यामध्ये झिंक, तांबे आणि लोह यांसारखे रोगप्रतिकारक शक्तीच्या कार्याशी संबंधित महत्त्वाचे पोषक घटक असतात. त्यामुळे पावसाळ्यातील दैनंदिन आहारात त्यांचा समावेश करणे हा एक सोपा आणि प्रभावी पर्याय ठरतो.”

## लेक्सस इंडिया ने ऑल-न्यू ईएस ३५०एच साठी बुकिंग्स सुरू केली

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

लेक्सस इंडिया ने ऑल-न्यू ES 350h या नव्याने सादर केलेल्या आठव्या पिढीतील एक्झिक्युटिव्ह सेडानच्या सेल्फ-चार्जिंग हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेरिएंटसाठी बुकिंग्स सुरू झाल्याची घोषणा केली आहे. ईएस ३५०एच मुळे ब्रँडचे इलेक्ट्रिफाइड पोर्टफोलिओ अधिक विस्तारले असून, नुकतेच लॉन्च झालेल्या ईएस ५००ई सोबत ग्राहकांना आकर्षक पर्याय उपलब्ध करून दिला आहे. तसेच, लेक्सस च्या कार्बन-न्यूट्रल भविष्याकडे जाणाऱ्या मल्टी-पाथवे दृष्टिकोनाला अधोरेखित केले आहे. ईएस च हे 1989 मध्ये फ्लॅगशिप LS सोबत पदार्पणापासून लेक्सस चे एक महत्त्वाचे जागतिक मॉडेल राहिले आहे. उत्कृष्ट शांतता, रायड कम्फर्ट आणि प्रशस्त इंटीरियरसाठी प्रसिद्ध असलेले ईएस आजपर्यंत




जगभरातील 80 पेक्षा अधिक देश आणि प्रदेशांमध्ये विकले गेले आहे. भारतातही हे मॉडेल लेक्सस च्या लाईन-अपमधील एक महत्त्वाचा स्तंभ ठरले असून, ब्रँडची बाजारपेठेतली उपस्थिती मजबूत करण्यामध्ये याने निर्णायक भूमिका बजावली आहे. ऑल-न्यू ईएस ३५०एच भारतात तयार केले जाणार असून, ईएस ५००ई सोबत त्याचे ॲडव्हान्स्ड प्लॅटफॉर्म आणि डिझाईन फिलॉसॉफी शेअर करत लेक्सस च्या भारतीय बाजारपेठेतील दृढ बांधिलकीला अधोरेखित करते. घोषणेवर प्रतिक्रिया देताना, लेक्सस इंडिया चे अध्यक्ष हिकारू इकेउची, म्हणाले: “ईएस फॅमिलीला अधिक मजबूत करताना, ऑल-न्यू ईएस ३५०एच भारतात तयार केले जाणार आहे. मागील जनरेशनच्या यशानंतर हा निर्णय घेतला असून, भारतीय बाजारपेठेबद्दल आमची कायमस्वरूपी बांधिलकी पुन्हा अधोरेखित करतो. हे नवीन मॉडेल लेक्सस च्या इलेक्ट्रिफिकेशनसाठीच्या मल्टी-पाथवे दृष्टिकोनाला अधोरेखित करते आणि भारतात शाश्वत मोबिलिटी पुढे नेण्याच्या आमच्या समर्पणाला अधिक बळकटी देते. या दिशेनुसार, आम्ही ऑल-न्यू ईएस ३५०एच साठी बुकिंग्स सुरू झाल्याची घोषणा करताना आनंदित आहोत—एक असे मॉडेल जे भारतातील आमच्या ग्राहकांकडून दीर्घकाळापासून आवडले गेले आहे. या नव्या जनरेशनबद्दल मिळालेला प्रतिसाद आणि अपेक्षा अत्यंत उत्साहवर्धक ठरल्या आहेत.” आमचे लक्ष आमच्या ग्राहकांना अधिक व्यापक इलेक्ट्रिफाइड वाहनांचे पोर्टफोलिओ देण्यावर केंद्रित आहे आणि नवीन ईएस ३५०एच हे त्या वचनाचे प्रतीक आहे. भारतात लेक्सस टाकुमी क्राफ्ट्समनशिपच्या भावनेने आणि जागतिक स्तरावर प्रत्येक लेक्सस ला परिभाषित करणाऱ्या वर्ल्ड-क्लास क्वालिटी स्टँडर्ड्ससह तयार केलेले, ईएस मध्ये ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी, उत्कृष्ट रायड कम्फर्ट आणि उल्लेखनीय स्थिरता आहे.

## ‘नीट’ परीक्षा घोटाळ्याच्या चौकशीसाठी सासवडमध्ये चक्री उपोषण




**सासवड (दै. संध्या) :**

'नीट' परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरव्यवहाराविरोधात दिल्ली येथे ज्येष्ठ शास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला नैतिक पाठिंबा दर्शवण्यासाठी पुरंदर तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आणि समविचारी संघटनांच्या वतीने शुक्रवार (ता.१७) पासून सासवड नगरपालिका समोर 'चक्री उपोषण' आयोजित करण्यात आले.

या आंदोलनात शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख अभिजीत मधुकर जगताप यांच्यासह जेष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार, लखन झुरंगे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संभाराजे जगताप, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष माणिक झेंडे, यांसह तसेच विविध राजकीय पक्ष, बहुजन हक्क परिषद, शेतकरी संघटना, राष्ट्र सेवा दल, मासूम संस्था, सामाजिक कार्यकर्ते, संस्था, पालक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

# ६,५०० एमएएच बॅटरी, ४४ वॅट जलद चार्जिंग आणि लष्करी दर्जाची मजबुती

## विवोचा ‘टी५ लाइट ४४ वॅट ५जी’ भारतात सादर

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

स्मार्टफोन क्षेत्रातील आघाडीची कंपनी विवो इंडियाने आपल्या टी मालिकेतील नवीन विवो टी५ लाइट ४४ वॅट ५जी हा स्मार्टफोन भारतीय बाजारात सादर केला आहे. दमदार ६,५०० एमएएच बॅटरी, ४४ वॅट जलद चार्जिंग, लष्करी दर्जाची टिकाऊ रचना, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा आणि आकर्षक रचना या वैशिष्ट्यांमुळे हा स्मार्टफोन तरुण ग्राहकांसाठी उपयुक्त पर्याय ठरणार असल्याचा कंपनीचा दावा आहे.

कंपनीच्या माहितीनुसार, सतत प्रवास करणारे, ऑनलाइन शिक्षण घेणारे, विविध प्रकारचा आशय तयार करणारे तसेच मनोरंजनासाठी मोबाईलचा मोठ्या प्रमाणावर वापर करणाऱ्या ग्राहकांचा विचार करून हा स्मार्टफोन विकसित करण्यात आला आहे. दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि दैनंदिन वापरात अधिक सुरक्षितता देणारी मजबूत रचना ही या उपकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या स्मार्टफोनमध्ये ६,५०० एमएएच क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली असून ती एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर तब्बल १५ दिवसांपर्यंत प्रतीक्षा स्थितीत राहू शकते, असा कंपनीचा दावा आहे. याशिवाय सुमारे ५४ तास संभाषण, ८० तास संगीत, ४८ तास स्थानिक व्हिडीओ प्लेबॅक, २० तास सामाजिक माध्यमांचा वापर आणि जवळपास १२.८ तास खेळांचा अनुभव मिळू शकतो.

४४ वॅट जलद चार्जिंगमुळे अल्पावधीत बॅटरी चार्ज होत असल्याने वापरकर्त्यांचा वेळ वाचतो. तसेच ही बॅटरी पाच वर्षांपर्यंत चांगली कार्यक्षमता




राखण्यासाठी विकसित करण्यात आल्याचे कंपनीने सांगितले आहे.

विवो टी५ लाइट ४४ वॅट ५जीला अनेक उंचीवरील पडण्याच्या चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर एसजीएसचे ट्रिपल अँटी-ड्रॉप प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तसेच या उपकरणाला लष्करी दर्जाच्या टिकाऊपणाचे प्रमाणनही मिळाले आहे. धूळ आणि पाण्यापासून संरक्षणासाठी आयपी६५ प्रमाणन असल्याने दैनंदिन वापरात हा स्मार्टफोन अधिक विश्वासार्ह ठरतो.

अँड्रॉइड १६ आधारित ओरिजिन ओएस ६ प्रणालीवर चालणाऱ्या या स्मार्टफोनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अनेक सुविधा देण्यात आल्या आहेत. आशय निर्मिती, कागदपत्र व्यवस्थापन, भाषांतर, ध्वनिमुद्रणाचे लिखित रूपांतर, स्वयंचलित मथळे तयार करणे यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी स्वतंत्र ‘प्रायव्हेट स्पेस’ सुविधा देण्यात आली आहे. विविध उपकरणांमध्ये फाइल शेअरिंग, स्क्रीन मिररिंग आणि नोंदी समक्रमित करण्यासाठी विशेष कार्यालयीन सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

### किंमत आणि उपलब्धता

विवो टी५ लाइट ४४ वॅट ५जीची किंमत पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे – ४ जीबी + १२८ जीबी : ₹१९,९९९, ६ जीबी + १२८ जीबी : ₹२१,९९९, ६ जीबी + २५६ जीबी : ₹२४,९९९

कंपनीच्या दाव्यानुसार या स्मार्टफोनमध्ये या किमतीच्या वर्गातील सर्वाधिक तेजस्वी १७.१३ सेंटीमीटर आकाराचा प्रदर्शन पडदा देण्यात आला आहे. हा स्मार्टफोन ट्रायलाइट शॅडो आणि वेव्ह ब्लू या दोन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध होणार आहे.

हा स्मार्टफोन २२ जुलै २०२६ पासून फ्लिपकार्ट, विवोच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच अधिकृत विक्री केंद्रांवर उपलब्ध होईल.

प्रारंभीच्या विक्रीदरम्यान एचडीएफसी, एसबीआय आणि ॲक्सिस बँकेच्या निवडक कार्डांवर ₹१,५०० पर्यंत तात्काळ सवलत तसेच तीन महिन्यांचा विनाव्याज हप्ता पर्याय उपलब्ध असेल. या ऑफर्समुळे ग्राहकांना स्मार्टफोन आणखी कमी प्रभावी किमतीत खरेदी करता येणार आहे. या विशेष ऑफर्स २२ जुलैपर्यंतच लागू असतील.

विवो इंडियाचे ऑनलाइन व्यवसाय प्रमुख पंकज गांधी यांनी सांगितले की, प्रत्येक ग्राहकाला त्यांच्या बजेटमध्ये सर्वोत्तम तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर आहे. तरुण वापरकर्त्यांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेला विवो टी५ लाइट ४४ वॅट ५जी दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, जलद चार्जिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा आणि मजबूत रचना यांचा समतोल साधत उत्कृष्ट वापर अनुभव देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आवश्यक असल्यास याच वृत्ताचे वृत्तपत्र शैलीतील, वेबसाइट एसईओ शैलीतील किंवा यूट्यूब व्हिडिओ स्क्रिप्ट स्वरूपही तयार करून देऊ शकतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पर्यटकांना दिलासा.. लोणावळा परिसरातील निर्बंध जिल्हाधिकाऱ्यांनी हटवले

पिंपरी (दैनिक संध्या) : लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील पर्यटनस्थळांसाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत लागू करण्यात आलेला आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी रद्द केला आहे. लोणावळा ग्रामीण परिसरातील एकवीरा देवी मंदिर, कार्ला व भाजे लेणी, भाजे धबधबा, लोहगड, विसापूर, तिकोणा व तुंग किल्ले, टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट, शिवलिंग पॉईंट, पवना धरण आदी पर्यटनस्थळी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असल्याने वाहतूक कोंडी व संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी ६ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत कलम १६३ लागू करण्यात आले होते. मात्र, सध्या पावसाचा वेग कमी झाला असून जनजीवन सुरळीत सुरू असल्याने परिस्थितीचा आढावा घेऊन ६ जुलै २०२६ रोजीचा आदेश रद्द करण्याबाबतची अधिसूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी जारी केली आहे.

### आशिष राऊत यांची पिंपरी उपबाजार विभाग प्रमुख पदी नियुक्ती

पिंपरी (दैनिक संध्या) : आशिष जयप्रकाश राऊत यांची कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे, उपबाजार पिंपरी विभाग प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकतेच आपल्या पदाचा कारभार स्वीकारला. आशिष



राऊत हे मागील काही वर्षांपासून कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथे कार्यरत होते. त्यांनी आतापर्यंत भाजीपाला गटप्रमुख, केळी बाजार विभाग प्रमुख अशा महत्त्वाच्या पदांवर काम करत त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखविली आहे. त्यांची आता पिंपरी उपबाजार गटप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी बोलताना आशिष राऊत म्हणाले की, पिंपरी फुलबाजार हे अल्पावधीतच नावारूपाला आलेले फुल बाजार आहे. हा फुलबाजार मध्यवर्ती ठिकाण असून या फुलबाजाराची व्याप्ती आता दिवसेंदिवस वाढत आहे. हा बाजार आणखी कसा वाढेल आणि येथील शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची किंमत कशी अधिकाधिक देता येईल यासाठी माझा प्रयत्न असणार आहे. तसेच मावळ, मुळशी, खेड, राजगुरुनगर, मंचर या ठिकाणाहून येणाऱ्या शेतकऱ्यांना अधिकाधिक सोयी सुविधा देण्यासाठी मी प्रयत्न असणार आहे. तसे पाहता मार्केटयार्ड पेक्षा पिंपरी फुलबाजार हा सर्वांसाठी सोईचा असून तो मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे तसेच येथून रेल्वे, मेट्रो व बसची सुविधा असल्यामुळे पुण्याच्या धर्तीवर इथे आधुनिक असे फुलबाजार करता येईल का यासाठी प्रयत्नशील रहाणार आहे. तसेच इथे येणारे शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक यांना ज्या काही समस्या भेडसावत असतील त्याचे निराकारण करण्यावर मी विशेष लक्ष देणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### दिघी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक एसीबीच्या जाळ्यात

पिंपरी (दैनिक संध्या) : अँटी करप्शन ब्युरो (एसीबी), पुणे यांनी दिघी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक चैताली गपाट (वय ३५) यांना ३ लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले आहे. एसीबीच्या माहितीनुसार, तक्रारदाराविरुद्ध दिघी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास पीएसआय गपाट यांच्याकडे होता. हा गुन्हा 'बी' फायनल करण्यासाठी तसेच भविष्यात मदत करण्याच्या मोबदल्यात त्यांनी सुरुवातीला ८ लाखांची लाच मागितल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने १४ जुलै रोजी एसीबीकडे तक्रार दाखल केल्यानंतर १५ जुलै रोजी पडताळणी करण्यात आली. पडताळणीत तडजोडीनंतर ३ लाखांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. यानंतर एसीबीने सापळा रचला. १५ जुलै रोजी सायंकाळी ५.४९ वाजता दिघी पोलीस ठाण्यात पीएसआय चैताली गपाट यांनी तक्रारदाराकडून ३ लाखांची रक्कम पंचांसमक्ष स्वीकारताच एसीबीने त्यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपी महिला पोलीस अधिकाऱ्याला ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास एसीबीकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील व अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सापळा कारवाई पोलीस निरीक्षक सुहास हट्टेकर यांनी केली असून तपास पोलीस निरीक्षक मिथुन म्हात्रे करत आहेत.

### मोशी दुर्घटनेनंतर कचरा व्यवस्थापनाचा बोजवारा

मोशी (दैनिक संध्या) : मोशी येथील कचरा डेपोवरील दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील कचऱ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरातील कचरा संकलन, कचऱ्याचे विलगीकरण आणि प्रक्रिया व्यवस्थापनाचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. मोशी कचरा डेपो बंद असल्याने या विस्कळीत व्यवस्थेचा थेट फटका कासारवाडी येथील महापालिकेच्या घनकचरा हस्तांतरण केंद्राला बसत आहे. क्षमतेपेक्षा जास्त कचऱ्याची आवक वाढल्याने या केंद्राचा अक्षरशः 'श्वास कोंडला' आहे. कासारवाडी येथील घनकचरा हस्तांतरण केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळच कचऱ्याचे मोठमोठे ढीग साचले आहेत. परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून, कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र आहे. मोशी कचरा डेपोवरील दुर्घटनेनंतर शहराच्या कचरा व्यवस्थापनातील त्रुटी उघड झाल्या आहेत. कचरा संकलन, विलगीकरण, वाहतूक आणि प्रक्रिया यासाठी सक्षम पर्यायी व्यवस्था उभी करण्याची गरज असताना, सध्या कासारवाडी केंद्रावरच कचऱ्याचा भार वाढत आहे. मोशी डेपो तातडीने सुरू करावा, कासारवाडी केंद्रातील साचलेला कचरा युद्धपातळीवर हटवावा आणि संपूर्ण कचरा व्यवस्थापन यंत्रणेचे नियोजन नव्याने करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या गंभीर समस्येबाबत ह क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य अधिकारी अंकुश झिटे तसेच महापालिकेचे आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रदीप ठेंगल यांच्याशी फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.



# महावितरणशी समन्वय साधल्याशिवाय खोदाईची कामे करू नका - आ.जगताप

- महावितरण, महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक
- गहुंजे येथे नवीन उपकेंद्र उभारणार
- चिंचवड मतदारसंघात अखंड वीजपुरवठ्यासाठी पावले

**पिंपरी (दै. संध्या)**

मागील आठवड्यात पिंपरी चिंचवड शहरात जोरदार पाऊस झाला. पावसामुळे रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरात पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याच्या घटना घडल्या होत्या. इतर विभागांकडून झालेल्या खोदाई दरम्यान भूमिगत वीजवाहिन्यांचे मोठे नुकसान झाल्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याचे समोर आले आहे. या समस्येची गंभीर दखल घेत, भविष्यात कोणत्याही विभागाने महावितरणशी परस्पर समन्वय साधल्याशिवाय खोदाईची कामे करू नयेत, असे स्पष्ट निर्देश आमदार शंकर जगताप यांनी दिले आहे. . तसेच, परिसरातील धोकादायक डीपींची तातडीने पाहणी करून दुरुस्ती करण्याच्या




सूचनाही दिल्या आहेत.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना अखंड, सुरक्षित आणि दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध व्हावा, तसेच वारंवार उद्भवणाऱ्या वीज समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा निघवा, या उद्देशाने महावितरण आणि पिंपरी चिंचवड मनपा वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत आमदार शंकर जगताप यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक गुरुवारी पार पडली. या बैठकीत मतदारसंघातील वीज खंडित होणे, धोकादायक डीपी, विद्युत यंत्रणेची सद्यस्थिती आणि भविष्यातील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना कडक निर्देश देण्यात आले. मागील आठवड्यात पिंपरी चिंचवड शहरात जोरदार पावसामुळे रावेत, किवळे आणि मामुर्डी परिसरात पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याच्या घटना घडल्या होत्या. इतर विभागांकडून झालेल्या खोदाईदरम्यान भूमिगत वीजवाहिन्यांचे मोठे नुकसान झाल्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याचे समोर आले आहे. या समस्येची गंभीर दखल घेत, भविष्यात कोणत्याही विभागाने महावितरणशी परस्पर समन्वय साधल्याशिवाय खोदाईची कामे करू नयेत, असे स्पष्ट निर्देश यावेळी देण्यात आले. तसेच, परिसरातील धोकादायक डीपींची तातडीने पाहणी करून दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या बैठकीला नगरसेवक धर्मपाल तंतरपाळे, कुणाल वाव्हळकर, रावेत-वाल्हेकरवाडी अध्यक्ष मोहन राऊत, श्रीकांत भोंडवे, दीपक भोंडवे यांच्यासह महावितरणचे अधिकारी रत्नदीप काळे, श्री. गिरी, श्री. मुंडे, श्री. लहाने, सुरेश गवारे आणि आशुतोष थोरात आदी उपस्थित होते.

आगामी काळात या भागाची विजेची वाढती मागणी आणि सक्षमीकरण लक्षात घेऊन महत्त्वाचे नियोजन करण्यात आले आहे. गहुंजे येथे २२०/२२ केव्ही, ३०० MVA क्षमतेचे नवीन महापारेषण उपकेंद्र उभारण्यात येत आहे याबबत सविस्तर चर्चा झाली. पुढील आठवड्यात महापारेषण आणि सर्व संबंधित विभागांची एक संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे.

## मानवनिर्मित पूरस्थितीला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करा; बिल्डरची जबाबदारी निश्चित करा - राहुल कलाटे

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गासह वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याच्या घटना घडल्या. काही सोसायट्यांच्या आवारात तसेच बेसमेंटमध्येही मोठ्या प्रमाणावर पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले.

याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक राहुल कलाटे यांनी हा विषय अत्यंत गांभीर्याने उपस्थित करत, ही परिस्थिती केवळ नैसर्गिक नसून अनेक ठिकाणी ती मानवनिर्मित असल्याचे स्पष्ट केले. तसेच महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापनाच्या सुविधा अपुऱ्या आहेत, पुरेसे पंप उपलब्ध नाहीत, त्यामुळे अनेक ठिकाणी मदत करण्यासाठी आम्हाला अडचण निर्माण होत होती, तर त्याबाबत महापालिकेने विचार करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच आमच्या भागात बिल्डरांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याची तत्परता मनपा अधिकारी दाखवतात. त्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर येऊन पाहणी करणे गरजेचे आहे. अनेक ठिकाणी पाण्याच्या लाईन नाहीत, तरी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत. त्यामुळे महानगरपालिका आयुक्तांनी बांधकाम परवानगी विभागाला यासंदर्भात सूचना द्यावता, असेही यावेळी कलाटे यांनी स्पष्ट केले.

राहुल कलाटे यांनी सांगितले की, "शहरातील विकासकामे आणि बांधकामे करताना काही ठिकाणी नैसर्गिक नाल्यांचे प्रवाह बुजविण्यात आले, जलनिस्सारणाच्या मार्गांवर अतिक्रमणे झाली किंवा योग्य नियोजन न करता बांधकामे करण्यात आली. परिणामी मुसळधार पावसात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवला जाऊन सोसायट्या, रस्ते आणि बेसमेंटमध्ये पाणी साचण्याच्या घटना घडत आहेत."

विशेषतः वाकडमधील विनोदे वस्ती, ताथवडे परिसरातील '41 Elite Krishala', पुनावळ्यातील सियोना पेठकर सोसायटीसह अशा इतर ठिकाणी उद्भवलेल्या परिस्थितीचा सखोल अभ्यास करून ज्या ठिकाणी बांधकामातील त्रुटी, नाले बुजविणे किंवा नियोजनातील निष्काळजीपणा आढळेल, त्या प्रकरणांमध्ये सोसायटीच्या संबंधित बिल्डरची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

राहुल कलाटे यांनी महापालिका प्रशासनाला शहरातील अशा सर्व संवेदनशील ठिकाणांची तातडीने पाहणी करून संभाव्य धोकादायक ठिकाणांची माहिती घेण्याची मागणी केली. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना त्वरित राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

"आज जे घडले, ते उद्या घडू नये. शहराच्या विकासाबरोबर नागरिकांची सुरक्षितता आणि मूलभूत सुविधा यांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. जबाबदारी निश्चित झाली तरच भविष्यात अशा निष्काळजीपणाला आळा बसेल," असे राहुल कलाटे यांनी सभागृहात ठामपणे मांडले.

## नामदेवराव जाधव यांच्या विरोधात केलेल्या तक्रारीची तातडीने दखल घेऊन कारवाई करा - उषामाई कांबळे

**पिंपरी (दै. संध्या)**

निगडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ललिता काळे या पीडित महिलेने प्रा. नामदेवराव जाधव यांच्या विरोधात २५ हजार रुपयाची फसवणूक केल्याची तक्रार दाखल करूनही, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या प्रकारामुळे संताप व्यक्त होत असून, शिवशाही शासन पक्ष महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा उषामाई कांबळे यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत निगडी पोलीस प्रशासने २४ तासांच्या आत कठोर कारवाई करावी अशी मागणी मेल द्वारे केलेल्या निवेदनात मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.



कांबळे यांनी निवेदनात म्हटले आहे की, संबंधित पीडित महिलेने प्रा. नामदेवराव जाधव यांच्या विरोधात निगडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीमध्ये अत्यंत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. मात्र, तक्रार दाखल होऊन बराच कालावधी उलटूनही पोलिसांकडून कोणतीही कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे पीडितेचा न्याय मिळण्याचा मार्ग लांबणीवर पडला आहे. या दिरंगाईमुळे समाजात तीव्र असंतोष पसरला असून, शिवशाही शासन पक्ष महिला आघाडीने या प्रकरणाला आता उचलून धरले आहे. कांबळे यांनी निगडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनाही निवेदनाद्वारे सदर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन सखोल चौकशी करावी. नियमानुसार तात्काळ गुन्हा दाखल करावा. दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी.

कायद्यापुढे सर्वजण समान आहेत. कोणत्याही प्रभावशाली व्यक्तीला कायद्याच्या वर समजले जाऊ नये. पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पुढील २४ तासांत कार्यवाही करावी आणि त्याबाबत लेखी माहिती द्यावी.या निवेदनाच्या प्रती पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगालाही पाठवण्यात आल्या आहेत. आता पोलीस प्रशासन या निवेदनावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## "एक दिवस शाळेसाठी" उपक्रमांतर्गत शहरातील १ लाख १३ हजार १७१ विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे मार्गदर्शन

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या "एक दिवस शाळेसाठी" या जनजागृती उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा, वाहतूक नियम, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

वाहतूक शाखेमार्फत १६ जुलै रोजी ३१ व्या टप्प्यात १५ टीममधील १२ अधिकारी व १८ अंमलदार



यांनी शहरातील १४ शाळांना भेट देऊन सुमारे १,८३५ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत ३१ टप्प्यांमध्ये ५०२ शाळांमधील तब्बल १ लाख १३ हजार १७१ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून वाहतूक आणि नागरी जबाबदाऱ्यांबाबत जनजागृती करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करून जबाबदार नागरिक घडविण्याचा उद्देश या उपक्रमामागे असल्याचे वाहतूक विभागाने सांगितले. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपआयुक्त किशोर देसाई यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेता हा उपक्रम पुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे.

## मावळातील जिल्हा परिषद शाळांची शिष्यवृत्ती कामगिरी घसरली

**वडगाव मावळ (दै. संध्या)**

पूर्व उच्च प्राथमिक व पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालावरून मावळ तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्तेचे पुन्हा तीनतेरा झाल्याचे दिसत आहे. आमदार, सभापती, उपसभापती, जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे झाले आहे.

दरवर्षी होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षा निकालानुसार मावळ तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेत आहे. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषद शिक्षण विभागात सुरू असलेला सावळागोंधळ निदर्शनास आणून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे.

तर, १० शाळांचा निकाल शून्य टक्के लागला होता. सन २०२५ मध्ये एकूण ६४ पैकी जिल्हा परिषद शाळेचे १७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले होते. तर, ७ शाळांचा निकाल शून्य टक्के लागला होता.

यावर्षी मात्र गुणवत्ता यादीत चमकलेल्या एकूण ६७ पैकी अवघे ९ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांचे असून, तब्बल २२ जिल्हा परिषद शाळांचा निकाल शून्य टक्के लागला आहे. परंतु दुसरीकडे याच शिक्षण खात्यातील शैक्षणिक गुणवत्ता मात्र ढासळत चालली असल्याचे दिसत आहे.

# वकिलांनी चित्तरंजन दास यांची भूमिका अंगीकारून लढावे - मेघवाल

**पिंपरी (दै. संध्या)**

'वकिलांनी देशभक्त चित्तरंजन दास यांची भूमिका अंगीकारून न्यायासाठी लढावे!' असे आवाहन केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी बहाई सेंटर, कोर्ट चेंबर, चर्चगेट, मुंबई येथे गुरुवार, दिनांक १६ जुलै २०२६ रोजी व्यक्त केले. दर्द से हमदर्द तक ट्रस्ट, सुप्रा लीगल फाउंडेशन आणि रिनोव्हेट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जस्टिस फॉरवर्ड २०२६' या विशेष परिषदेत मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना अर्जुन राम मेघवाल बोलत होते. महाराष्ट्र राज्य कॅबिनेट कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, भारत सरकारचे डेप्युटी सॉलिसिटर जनरल अ‍ॅड. प्रवीण फलदेसाई, अ‍ॅडिशनल जनरल अ‍ॅड. अनिल सिंग, दर्द से हमदर्द तक ट्रस्टचे सचिव अ‍ॅड. प्रकाश साळसिंगीकर, सुप्रा लीगल फाउंडेशनच्या संचालिका अ‍ॅड. सुनीता खंडाळे - साळसिंगीकर, ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. सतिश गोरडे, रिनोव्हेट इंडियाचे प्रथमेश रावराणे, अ‍ॅड. रवींद्र लोखंडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

अर्जुन राम मेघवाल पुढे म्हणाले की, 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सगळेच सहानुभूती व्यक्त करतात; परंतु न्यायापासून वंचित असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कैद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी दर्द से हमदर्द तक ट्रस्ट करीत असलेले कार्य खरोखरच स्तुत्य आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महर्षी अरविंद घोष यांच्यावर




ब्रिटिश सरकारने खटला दाखल केला होता. त्यावेळी अरविंद यांनी कोणत्याही वकिलाला आपली बाजू मांडण्यासाठी नियुक्त केले नव्हते; परंतु देशभक्त चित्तरंजन दास यांनी स्वतःहून तो खटला लढवला आणि अरविंद घोष यांची न्यायालयातून निर्दोष मुक्तता केली होती. त्यामुळे महर्षी अरविंद घोष यांना देशासाठी खूप मोठे योगदान देता आले. त्यामुळेच विधी क्षेत्रातील भावी वकिलांनी चित्तरंजन दास होऊन काम केले पाहिजे!' अ‍ॅड. प्रकाश साळसिंगीकर यांनी प्रास्ताविकातून कायदेशीर मदतीचे बळकटीकरण आणि भविष्यातील वकिलांचे सक्षमीकरण ही परिषदेची मुख्य संकल्पना असल्याची माहिती दिली. यावेळी विधी श्रेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या लीगल अ‍ॅड. चॅम्पियन्सचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला; तसेच २०२६ विधी साहाय्य (Legal Aid), संरक्षण वकील व्यवस्था (Legal Aid Defence Counsel System),

एमएसएलएसए (MSLSA), डीएसएचटी (DSHT) आणि सुप्रा लीगल फाउंडेशन (Supra Legal Foundation) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेले सर्वेक्षण प्रकाशित करण्यात आले. मंगल प्रभात लोढा यांनी मनोगत व्यक्त केले. अ‍ॅड. रवि रंजन यांनी सूत्रसंचालन केले. अ‍ॅड. रवींद्र लोखंडे यांनी आभार मानले. संयोजनात अ‍ॅड. गणेश नागरगोजे, अ‍ॅड. ओंकार पाटील, अ‍ॅड. भूषण पाटील, अ‍ॅड. अशी नारायण, अ‍ॅड. विघ्नेश सुब्रमण्यम, अ‍ॅड. नितीन हजारे यांनी सहकार्य केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### भिगवण सायकल क्लबची भिगवण ते पंढरपूर सायकल वारी पूर्ण

भिगवण (दैनिक संध्या) : येथील भिगवण सायकल क्लबच्या सदस्यांनी दि. १६ रोजी भिगवण ते पंढरपूर असा ११५ किलोमीटरचा सायकल प्रवास अवघ्या सहा तासात पूर्ण केला. यावेळी 'सायकल चालवा तंदुरूस्त रहा', 'झाडे लावा झाडे जगवा' असा संदेश दिला. सायकल वारीचे हे यंदाचे नववे वर्ष होते. या सायकल वारीमध्ये ११ वर्षाच्या सार्थक चव्हाण या लहान मुलापासून ते ६८ वर्षाच्या सेवानिवृत्त मेजर भांडवलकर या ज्येष्ठ नागरिकापर्यंत सदस्यांनी सहभाग नोंदवला. पहाटे दोन वाजता निघालेली ही सायकल वारी भिगवण-इंदापूर -अकलूज या पालखी मार्गाने पंढरपूर या ठिकाणी सकाळी दहा वाजता पोहोच झाली.भिगवण सायकल क्लबच्या सदस्यांकडून अनेक सायकल राईड मध्ये सहभाग घेतला जातो. यातील अनेक सदस्य दोनशे किलोमीटर, शंभर किलोमीटर सायकलवर प्रवास करतात. सायकल चालवण्यामागे स्वतःचे आरोग्य चांगले राहावे, रोगप्रतिकारक शक्ती वाढावी हा हेतू असून, याबरोबरच समाजामध्ये आरोग्याबद्दल जागरुकता निर्माण व्हावी हादेखील प्रमुख हेतू असतो. या सायकल प्रवासामध्ये भिगवण येथील सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर पवार यांनी एका टेम्पोची सुविधा करून दिली होती. या सायकल सदस्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सायकल क्लबचे माजी अध्यक्ष संपत बंडगर, अल्ताफ शेख,नामदेव कुदळे, साहिल मुलानी यांनी सहभाग नोंदवला. या सायकल वारीमध्ये क्लबचे अर्जुन तोडेकर, केशव भापकर, संतोष सवाने, विजयकुमार हंगे, श्याम सातार्ले,औदुंबर हुलगे, योगेश चव्हाण, डॉ. भारत भरणे,कुलदीपक ननवरे, डॉ. अमित खानावरे,अथर्व दाताळ, डॉ. संकेत मोरे यांनी सहभाग नोंदवला. सायकल प्रवास यशस्वी पूर्ण केल्याबद्दल रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रवीण वाघ, निखिल बोगावत व रियाज शेख यांनी या सर्वांचे स्वागत केले.




### रेणुका नगर रहिवासी संघाच्या वतीने 'एक घर – एक झाड' हरित उपक्रम उत्साहात संपन्न

बारामती (दैनिक संध्या) : स्व.आदरणीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांच्या जयंतीनिमित्त रेणुका नगर रहिवासी संघाच्या वतीने रेणुका नगर,फलटण रोड,कसबा येथे "एक घर – एक झाड" या हरित उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या उपक्रमांतर्गत २५१ देशी वृक्षांचे मोफत वाटप करण्यात आले.नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक घरात किमान एक देशी वृक्ष लावण्याचा संकल्प केला. कार्यक्रमास शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष किरणभाऊ इंगळे,राष्ट्रवादी युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे,साधू बल्लाळ,चिऊशेठ जंजिरे,सचिन काकडे,प्रतीक जगताप,शुभम पडळकर,पै.गणेश आटपडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. हा उपक्रम मा.जनसेवक प्रतिक शिवाजीराव ढवाण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.रेणुका नगर रहिवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष योगेश संजय महाडिक यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबुलाल शेख,जमीर बागवान, अमीन अन्सारी,रणजित मोतीकर, आशपाक शेख,रफिक शिकलकर, इम्तियाज तांबोळी,अकबर महावीर गायकवाड,तांबोळी,कर्मवीर खन्ना,अमीर शेख शाबीर तांबोळी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### संत सोपानकाका पालखी सोहव्यानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर संपन्न




■ सुनिल भगत मित्र परिवाराच्या वतीने सामाजिक उपक्रम

कोऱ्हाळे (दैनिक संध्या) : संत श्री सोपानकाका महाराज पालखी सोहळ्यात कोऱ्हाळे बु!! या ठिकाणी सुनील भगत मित्र परिवार यांच्यावतीने वारकरी भक्तांच्या आरोग्य तपासणी चे शिबिर घेण्यात आले. सुनिल भगत यांनी स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून आरोग्य तपासणी शिबिरास सुरुवात केली.साईकृपा हॉस्पिटल यांच्या सहकार्याने यावेळी 400 ते 500 वारकरी भक्तांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# शेतीच्या कामासाठी ३६ शेतमजुरांना ठेवले डांबून

**मुकादमावर गुन्हा दाखल**

नारायणगाव (दै. संध्या)

जळगाव व नाशिक जिल्ह्यातील आठ कुटुंबातील ३६ शेतमजुरांना दोन वर्ष बंधनात ठेवून, मारहाण करून धमकावून त्यांच्या इच्छेविरुद्ध कमी पगारात ऊसतोड व इतर कामे करून घेतल्या प्रकरणी नारायणगाव पोलिसांनी वळती तालुका आंबेगाव येथील मुकादम खंडू भानुदास माने वय ३६ याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. आरोपी फरार झाल्याने त्याला अद्याप अटक करण्यात आली नाही. अशी माहिती नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांनी दिली.

याबाबत शेतमजूर सुरेश रवींद्र सोनवणे वय 30, सध्या राहणार सुलतानपूर,फाईन मळा,ता. जुन्नर, मूळ राहणार भिलाटी आनंदनगर ,ता.एरंडोल ,जि. जळगाव यांनी नारायणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

जळगाव व नाशिक जिल्ह्यातील आठ कुटुंबातील ३६ सदस्य आरोपी खंडू माने याच्याकडे मे २०२४ पासून ऊस तोडणी व इतर कामासाठी आले होते. सुलतानपूर येथे झोपड्या बांधून या कुटुंबांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

आरोपी माने याने फिर्यादीसह सुरेंद्र रवींद्र सोनवणे, दुर्गा सुरेश सोनवणे, जितू सुरेश सोनवणे,



दादू संजू सोनवणे, संगीता दादू सोनवणे, राणी दादू सोनवणे,चांदनी दादू सोनवणे, दिव्या दादू सोनवणे, विनोद भगवान गायकवाड, सखू विनोद गायकवाड, सारिका विनोद गायकवाड, राधिका विनोद गायकवाड, नेहा विनोद गायकवाड, शंकर शामराव मोरे, उमा शंकर मोरे,सावन शंकर मोरे, अक्षरा शंकर मोरे, भगवान रामदास गायकवाड, रवी रामदास सोनवणे, लक्ष्मी नामदेव सोनवणे, राजेंद्र रामदास सोनवणे, सुरेखा राजेंद्र सोनवणे, कृष्णा राजेंद्र सोनवणे, रोशनी राजेंद्र सोनवणे, ज्ञानेश्वर देवचंद सोनवणे, दिव्या ज्ञानेश्वर सोनवणे, संगीता ज्ञानेश्वर सोनवणे, शिवा ज्ञानेश्वर सोनवणे, गंगाबाई ज्ञानेश्वर सोनवणे, उषा नामदेव सोनवणे, खुशी नामदेव सोनवणे, साई नामदेव सोनवणे, अनिल शिवाजी बर्डे, शिव अनिल बर्डे, कविता अनिल बर्डे, मोहन नामदेव सोनवणे या शेतमजुरांची आधार कार्ड, मोबाईल स्वतःच्या ताब्यात ठेवले.

मागील दोन वर्ष त्यांच्याकडून १२ ते १८ तास काम करून घेतले. मात्र ठरलेला पगार दिला नाही. हिशोब मागितल्यानंतर मारहाण, शिवीगाळ करून धमकावले.इच्छा नसताना देखील सुरेश सोनवणे यांच्यासह आठ कुटुंबातील ३६ शेतमजुरांकडून सक्तीने काम करून घेतले.याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जे.आय.पाटील करत आहेत.

## मयत कर्जदाराला 'जिवंत' दाखवून वसुलीचा प्रयत्न

### न्यायालयाच्या आदेशानंतर 'शिवकृपा' पतपेढीच्या पदाधिकाऱ्यांची पोलीस चौकशी

विक्रोळी (दै. संध्या)

मयत कर्जदाराला कागदोपत्री जिवंत दाखवून न्यायालय आणि सहकार विभागाची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप मुंबईतील शिवकृपा सहकारी पतपेढी लिमिटेडच्या पदाधिकाऱ्यांवर करण्यात आला आहे. या प्रकरणाची दखल घेत ३१ वे महानगर दंडाधिकारी न्यायालय, विक्रोळी यांनी संबंधित पोलिसांना चौकशी करून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम १७५(३) अन्वये आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

तक्रारदार प्रल्हाद शिरोडकर यांनी न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे वडील प्रमोद शिरोडकर यांनी शिवकृपा सहकारी पतपेढीकडून कर्ज घेतले होते. त्यांच्या निधनानंतर संबंधित कर्जाचा जीवन विमा (डेथ क्लेम) पतपेढीने वसूल




केला होता. त्यामुळे कर्जदाराचा मृत्यू झाल्याची संपूर्ण माहिती पतपेढीच्या प्रशासनाला होती. असे असतानाही, शिवकृपा सहकारी पतपेढीचे अध्यक्ष गोरख चव्हाण, उपाध्यक्ष चंद्रकांत वंजारी, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेटे, वरिष्ठ महाव्यवस्थापक (प्रशासन) सुदाम जाधव आणि वरिष्ठ वसुली अधिकारी अशोक फडतरे यांनी संगनमत करून मयत कर्जदाराला जिवंत असल्याचे दर्शविल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या कथित चुकीच्या माहितीच्या आधारे शासकीय उपनिबंधक सहकारी संस्था आणि न्यायालयाकडून वसुलीचे आदेश मिळविण्यात आल्याचा दावाही करण्यात आला आहे. या कथित प्रकारामुळे मानसिक त्रास सहन करावा लागल्याने तक्रारदार प्रल्हाद शिरोडकर यांनी न्यायालयात फौजदारी तक्रार दाखल केली. न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रांचा प्राथमिक आढावा घेतल्यानंतर प्रकरणात चौकशीची आवश्यकता असल्याचे नमूद करत संबंधित पोलिसांना तपासाचे आदेश दिले आहेत.

तक्रारदार प्रल्हाद शिरोडकर म्हणाले, "माझे वडील मयत झाले असून संस्थेने त्यांच्या कर्जावरील विमा दावाही स्वीकारला होता. तरीदेखील आम्हाला त्रास देण्यासाठी आणि बेकायदेशीर वसुलीसाठी त्यांना कागदोपत्री जिवंत दाखवण्यात आले. हा न्यायालय आणि शासकीय यंत्रणेची दिशाभूल करण्याचा गंभीर प्रकार आहे. न्यायालयाच्या आदेशामुळे आम्हाला न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे."

न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधित पोलिसांनी तपास सुरू केला असून, चौकशीत आरोपांना पुष्टी मिळाल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे. या प्रकरणामुळे सहकार क्षेत्रात खळबळ उडाली असून, पतसंस्थांमधील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## लेखक मिलिंद कदम यांना अजेय लेखणी पुरस्कार प्रदान

चिपळूण (दै. संध्या)

आर्यारवी एंटरटेनमेंट'च्या वतीने येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मिलिंद कदम यांना अजेय लेखणी पुरस्काराने गौरविण्यात आले रविवारी (दि. १२ जुलै २०२६) दादर मुंबई येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर सभागृहात कदम यांना ज्येष्ठ साहित्यिक कवी प्रा. विसुभाऊ बापट, साहित्यिक अरुण म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर तोडणकर, आर्यारवी एंटरटेनमेंटचे सर्वेसर्वा महेश्वर तेटांबे, यांच्याहस्ते सन्मानपूर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. समाजहित व जागृतीचे ध्यास उराशी बाळगून परखड लिखाण करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचे लिखाण समाजासाठी दिशादर्शक आहे, अशी भावना यावेळी आयोजकांकडून व्यक्त करण्यात आली. ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडतानाच तळागाळातील लोकांना न्याय मिळवून देणाऱ्या तसेच समाज जागृतीचे अलौकिक



काम करणाऱ्या राज्यभरातील निवडक लेखक आणि पत्रकार यांना एंटरटेनमेंट'च्या वतीने कौतुकाची थाप देण्यासाठी हा पहिलाच पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. समाजसेवेची अखंड धडपड, सदैव तत्पर असणारे खेरशेत गावचे सुपुत्र मिलिंद कदम जनसेवेलाच खरा धर्म मानत समाजकल्याणासाठी निःस्वार्थ भावनेने समर्पित जीवन जगत आहेत. सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेले नेतृत्व, अशी त्यांची वेगळी ओळख आहे. आपले वडील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते काशीराम कदम गुरुजी, आई प्रभावती यांच्या प्रेरणेतून आणि संस्कारातून कदम यांना तरुण वयातच समाजसेवेची आवड निर्माण झाली.

## कासारीतील सोनारमळा रस्ता वर्षानुवर्षे दुरावस्थेत

तळेगाव ढमढेरे (दै. संध्या)

कासारी (ता. शिरूर) सोनार मळा येथे येण्या - जाण्यासाठी वर्षानुवर्ष दुरावस्था झालेल्या रस्त्याने स्थानिक ग्रामस्थांना मार्गक्रमण करावा लागत आहे. पावसाळ्यात अतिशय बिकट परिस्थिती या रस्त्याची होते. शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतमजूर व स्थानिक ग्रामस्थांना या लोकवस्तीवर येण्या- जाण्यासाठी पावसाळ्यात प्रचंड कसरत करावी लागते. पावसाळ्यात या रस्त्याने पायी चालणे अतिशय कठीण होते. वाहने तर या रस्त्याने जाऊ शकत नाहीत. या रस्त्याने येण्या- जाण्यासाठी ग्रामस्थांना जीव मुठीत धरावा लागतो. रात्रीच्या वेळी तर अत्यंत भयानक कसरत करावी लागते. त्यातच परिसरात बिबट्याच्या भीतीने ग्रामस्थ भयभीत होतात. "सोनार मळा येथे येण्या- जाण्यासाठी... अहो.. कोणी रस्ता देता का... रस्ता देता का... अशी विचारणा ग्रामस्थ करीत आहेत." हा रस्ता वर्षानुवर्ष दुरुस्त झालेला नाही. रस्ता केव्हा दुरुस्त होईल या प्रतीक्षेत स्थानिक ग्रामस्थ आहेत. सोनार मळा रस्ता तळेगाव ढमढेरे व कासारी गावच्या हद्दीत येतो. येथे सुमारे २० घर व तेथील लोकसंख्या साधारण १०० च्या आसपास आहे. प्रशासनाने त्वरित या लोकवस्तीवर येण्या- जाण्यासाठी रस्ता करावा अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## "एक छोटासा हात, आनंदाची मोठी साथ!"

■ ओमकार साई बाल संगोपन केंद्रातील बालिकांना जनजागृती सेवा संस्थेकडून खाऊचे तसेच दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

डोंबिवली (दै. संध्या)

गोड,निरागस, खोडकर , खेळकर चिमुकल्या बालिकांसाठी आज वेळात वेळ काढून "ओमकार साई बालसंगोपन" केंद्रातील बालिकांना खाऊ तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या मुलभूत जीवनावश्यक वस्तू भेट म्हणून देण्यात आल्यात.

यावेळेस बालसंगोपन केंद्रातील मुलींच्या आनंदाला पर्वणीच मिळाली!! "प्रत्येक मूल एक निरागस रोपटे असते. त्याला योग्य संस्कारांचे खतपाणी दिले तरच त्याचा उत्तम वृक्ष बनतो."

खरंच बालिका संगोपन म्हणजे केवळ मुलींचे पालनपोषण करणे नव्हे, तर त्यांना उत्तम संस्कार आणि प्रेम देणे होय.मुलींच्या




संगोपनात आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यात या केंद्राने किती मोलाचे योगदान दिले हे या बालिकांच्या कलात्मक गुणातून दिसते,

"संगोपन संस्थेतील प्रत्येक मूल म्हणजे मातीचा एक असा गोळा आहे, ज्याला प्रेमाने घडवल्यास एक सुंदर मूर्ती तयार होऊ शकते."

या मुलांना घर जरी नसलं, तरी स्वप्नं मोठी आहेत.आपले सगेसोयरे कोणीही नसले, तरी पंखात उडण्याची जिद्द आहे."

या मुलांसोबत घालवलेले आजचे हे प्रेमळ क्षण!!

हे त्यांच्यातही एक सुंदर, निष्पाप आणि प्रेमळ जग दडलेले आहे हे दाखवून देते. यावेळेस ओमकार साई बालसंगोपन केंद्राच्या अध्यक्षा सुविधा दांडेकर, जनजागृती संस्थेतर्फे संस्थेचे सदस्य पुनम कदम,(सामाजिक कार्यकर्त्या- डोंबिवली शहर) शोभा राणे, वर्षा मोहिते,सायली पांडव, निता नेवरेकर या उपस्थित होत्या.

जनजागृती सेवा संस्था बालसंगोपन केंद्रातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आनंदासाठी दरवर्षी विशेष वेगवेगळे उपक्रम राबवत असते त्यातील हा एक उपक्रम ज्यातून मुलांना प्रेमाची व आपलेपणाची अनुभूती मिळते.

कारण अश्या प्रकारच्या उपक्रमातून त्यांच्यात नक्कीच आनंदाचे वातावरण निर्माण होते.

# देशातील ७५ आणि महाराष्ट्रातील दोन अमृत रेल्वे स्थानकांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण

### बारामती रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती मिळेल – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

बारामती (दै. संध्या)

अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत देशातील ७५ अत्याधुनिक अमृत रेल्वे स्थानकांचे तसेच महाराष्ट्रातील बारामती आणि नांदुरा या दोन पुनर्विकसित रेल्वे स्थानकांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. यावेळी बारामती रेल्वे स्थानक येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मनोगत व्यक्त करताना बारामती रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास हा केवळ स्थानकाचा कायापालट नसून बारामतीसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि कृषी विकासाला नवी गती देणारा टप्पा असल्याचे सांगितले.

यावेळी पुणे रेल्वे विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश




कुमार वर्मा, बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव,उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे,रेल्वे विभागाचे अधिकारी-कर्मचारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेचा आधुनिकतेकडे वेगाने प्रवास सुरू असून जागतिक दर्जाच्या सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षित आणि प्रवासीस्नेही सेवा यामुळे भारतीय रेल्वे नव्या भारताच्या विकासाचे प्रतीक बनली आहे. अमृत भारत स्टेशन योजना, वंदे भारतसारखे उपक्रम हे त्या परिवर्तनाचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले.

बारामती रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, विकासाची जाणीव आणि सर्जनशीलता

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण**

देशातील ७५ आणि महाराष्ट्रातील दोन अमृत भारत रेल्वे स्थानकांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडले. त्यानंतर बारामती येथील पुनर्विकसित रेल्वे स्थानकाच्या कोनशिलेचे प्रत्यक्ष अनावरण उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पुनर्विकसित रेल्वे स्थानकाची पाहणी केली. तसेच स्थानकावर थांबलेल्या रेल्वेत जाऊन विक्रेत्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व अनुभव जाणून घेतले.

वाढावी या उद्देशाने निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. "विकसित रेल्वे स्थानकाचा भारत" आणि "विकसित भारत घडवण्यासाठी मी काय करेन" या विषयांवर झालेल्या स्पर्धांमध्ये एम.ई.एस. गजाननराव भीमराव देशपांडे विद्यालय, निर्मला हरिभाऊ प्राथमिक शाळा तसेच इतर शाळांतील एकूण २ हजार ८५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वच्छ, आधुनिक, पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक रेल्वे स्थानकाची संकल्पना मांडत विकसित भारतासाठी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शिस्त, शिक्षण, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच विजेत्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

देशातील आतापर्यंत २६१ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास पूर्ण झाला असून आज आणखी ७५ स्थानके राष्ट्राला समर्पित होत आहेत, ही देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले.

महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांना मोठी गती मिळाली असून बारामती रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास त्याचाच एक महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. उद्योग, शिक्षण, कृषी आणि सहकार क्षेत्रातील बारामतीची ओळख अधिक बळकट करण्यासाठी हे आधुनिक स्थानक उपयुक्त ठरेल. औद्योगिक क्षेत्राला वाहतूक सुविधा, कृषी उत्पादनांना बाजारपेठ, तसेच शिक्षणासाठी येणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांचा गुणगौरव**


पुणे विभागीय रेल्वे मंडळाकडून बारामती येथील शाळा मधील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शिस्त, शिक्षण, तंत्रज्ञान या विषयांवर स्पर्धा आयोजित केली होती. त्यातील यशस्वी विध्यार्थ्यांचा गौरव उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला.

सुमारे साडे २६ कोटी रुपये खर्चून बारामती रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास करण्यात आला असून त्यासाठी राज्य शासन आणि रेल्वे मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. स्थानकाच्या इमारतीमध्ये आधुनिक सुविधांसह स्थानिक संस्कृतीचे प्रतिबिंब दिसेल अशी वास्तुरचना करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा, आधुनिक प्रतीक्षागृह, स्वच्छ प्रसाधनगृहे, सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था, पर्यावरणपूरक सौरऊर्जा प्रणाली तसेच स्थानिक हस्तकला आणि उत्पादनांच्या विक्रीसाठी विशेष दालनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामुळे 'व्होकल फॉर लोकल' संकल्पनेलाही चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

बारामतीच्या सर्वांगीण विकासासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान स्मरणात ठेवून विकासाचा हा वारसा पुढे नेण्याचे आवाहनही त्यांनी केले. केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून विकासकामांना गती मिळत असून बारामती रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास त्याचेच उदाहरण असल्याचे त्या म्हणाल्या.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# नवीन ॲग्रीगेटर धोरण लागू; प्रवाशांची सुरक्षितता, चालकांचे हित आणि मराठी युवक-युवतींसाठी रोजगाराच्या नव्या संधी


परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक सेवा अधिक सुरक्षित, पारदर्शक, जबाबदार आणि नियमबद्ध करण्यासाठी राज्य शासनाने नवीन ॲग्रीगेटर धोरण लागू केले असून, ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या ॲग्रीगेटर कंपन्यांना शासनाने निर्धारित केलेल्या नियम व अटींचे पालन करूनच व्यवसाय करणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. या धोरणामुळे शासनाला कायदेशीर महसूल मिळणार असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य मिळेल तसेच चालकांचे आर्थिक हित आणि स्थानिक युवक-युवतींसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, राज्यातील लाखो प्रवासी दररोज ॲप-आधारित वाहतूक सेवांचा वापर करतात. मात्र, या क्षेत्रात एकसमान नियमावली नसल्यामुळे प्रवासी सुरक्षा, चालकांचे उत्पन्न, भाडे आकारणीतील मनमानी, तक्रार निवारणातील विलंब आणि शासनाच्या महसुलाबाबत अनेक प्रश्न निर्माण होत होते. नव्या धोरणामुळे या सर्व बाबींना कायदेशीर आणि पारदर्शक चौकट प्राप्त झाली आहे.

या धोरणानुसार राज्यात कार्यरत असलेल्या प्रत्येक ॲग्रीगेटर कंपनीला राज्य परिवहन प्राधिकरणाकडून परवाना घेणे बंधनकारक राहणार आहे. प्रत्येक कंपनीला स्वतंत्र परवाना ओळख क्रमांक प्रदान करण्यात येणार असून, त्यासाठी निर्धारित शुल्क आकारण्यात येईल. यामुळे ॲग्रीगेटर व्यवसायाचे प्रभावी नियमन होण्याबरोबरच शासनाच्या महसुलातही वाढ होणार आहे. राज्य शासनामार्फत विशेष ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात येणार असून, त्याद्वारे ॲग्रीगेटरशी संलग्न वाहनांवर रिअल-टाईम देखरेख ठेवण्यात येईल. वाहनांचे जीपीएस ट्रॅकिंग, चालकांची पडताळणी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची यंत्रणा या पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला या धोरणात सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. प्रत्येक ॲग्रीगेटरसाठी २४ तास कार्यरत कॉल सेंटर, तक्रार निवारण अधिकारी आणि निर्धारित कालावधीत तक्रारींचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. चालकांकडे वैध वाहन परवाना आणि बॅज असणे, त्यांना आवश्यक प्रशिक्षण देणे तसेच सलग १२ तासांपेक्षा अधिक वाहन चालविण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवाशांना चालकांना रेटिंग देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली असून, चालक आणि सहप्रवाशांसाठी विमा संरक्षणाची तरतूदही करण्यात आली आहे. चालकांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत एकूण भाड्याच्या किमान ८० टक्के रक्कम चालकांना मिळणे शाश्वती घेण्यात आली आहे. त्यामुळे अन्यायकारक कमिशन आकारणीला आळा बसून चालकांना न्याय्य मोबदला मिळणार आहे.

भाडे आकारणीतील मनमानी रोखण्यासाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत मूलभूत भाडे निश्चित करण्यात येणार आहे. सर्ज प्रायसिंगला मर्यादा घालण्यात आली असून, सवलतीच्या नावाखाली अवास्तव दरकपात अथवा अतिरिक्त भाडे आकारणीवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. सुविधा शुल्कालाही कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना पारदर्शक आणि न्याय्य दरात सेवा उपलब्ध होईल.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, हे ॲग्रीगेटर धोरण कोणत्याही एका मोठ्या व्यावसायिक गटाच्या हिताचे न राहता सर्वसामान्य वाहनमालकांना संधी उपलब्ध करून देणारे आहे. यासाठी कोणत्याही वाहनमालकाकडे एका ॲप प्लॅटफॉर्मवर नोंदणीकृत वाहनांची संख्या मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर या शहरांमध्ये ५० पेक्षा अधिक असू शकणार नाही, तर राज्यातील इतर भागांमध्ये ही मर्यादा २५ वाहनांची असेल. ही मर्यादा प्रत्येक प्लॅटफॉर्मवरील विक्रेता फ्लीटसाठी स्वतंत्रपणे लागू राहील. 'श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होऊ नये,' या सामाजिक समतोलाच्या भूमिकेतून ही तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील व्यावसायिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या चालकांसाठी बॅज अनिवार्य करण्यात आला आहे. बॅज प्राप्त करण्यासाठी चालकांकडे आवश्यक कागदपत्रांसह महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचा पुरावा आणि व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहणार आहे. यामुळे प्रवाशांना त्यांच्या भाषेत संवाद साधणारे प्रशिक्षित आणि जबाबदार चालक उपलब्ध होतील. "महाराष्ट्रातील रोजगाराच्या संधींवर सर्वप्रथम महाराष्ट्रातील युवक-युवतींचा हक्क आहे. व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान आणि आवश्यक पात्रता असलेल्या स्थानिक युवक-युवतींना ॲप-आधारित वाहतूक क्षेत्रामध्ये सन्मानजनक आणि शाश्वत रोजगाराच्या मोठ्या संधी या धोरणामुळे उपलब्ध होणार आहेत," असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राईड पूलिंग सेवेमध्ये महिला प्रवाशांना केवळ महिला चालक अथवा महिला सहप्रवाशांसोबत प्रवास करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे महिलांच्या सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाला अधिक बळ मिळणार आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी प्रत्येक ॲग्रीगेटर कंपनीचे मोबाईल ॲप आणि संकेतस्थळ मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये उपलब्ध असणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना सेवांचा वापर करणे अधिक सुलभ होणार आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक तसेच पर्यायी इंधनावरील वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यात आले असून, राज्यातील वाहतूक व्यवस्था अधिक शाश्वत आणि पर्यावरणपूरक करण्यावर भर देण्यात आला आहे.याशिवाय, कारपूलिंग सेवेला प्रथमच कायदेशीर चौकट प्रदान करण्यात आली आहे. खासगी वाहनांद्वारे कारपूलिंगला परवानगी देण्यात आली असून, त्यातून नफा कमावण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवासाचा खर्च सहभागी प्रवाशांमध्ये वाटून घेण्याची मुभा देण्यात आली आहे. या निर्णयामुळे नागरिकांना परवडणारा प्रवासाचा पर्याय उपलब्ध होण्याबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करण्यासही मदत होणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, महाराष्ट्रात व्यवसाय करू इच्छिणाऱ्या कोणत्याही ॲग्रीगेटर कंपनीने राज्य शासनाच्या नियमावलीचे काटेकोर पालन करणे अपरिहार्य आहे. शासनाचा महसूल वाढविणारे, प्रवाशांचा विश्वास दृढ करणारे, चालकांचे हित जपणारे, स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देणारे आणि भाडे व्यवस्थेत पारदर्शकता आणणारे हे धोरण राज्याच्या वाहतूक क्षेत्रात सकारात्मक आणि दूरगामी बदल घडवून आणेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"चालकांचे हित, प्रवाशांची सुरक्षितता आणि स्थानिक युवकांना रोजगार या तीन महत्त्वाच्या उद्दिष्टांचा समतोल साधत महाराष्ट्रात सुरक्षित, जबाबदार, आधुनिक आणि शाश्वत ॲग्रीगेटर सेवा व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने हे धोरण एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे," असेही प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### संशोधन सुविधा निर्माण कराव्यात : मुख्यमंत्री

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील कर्करोग रुग्णांवर उपचारासाठी महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन कंपनी (महाकेअर)च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उपचार व संशोधन सुविधा निर्माण कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन कंपनी संचालक मंडळाची पहिली बैठक सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, सचिव विकासचंद्र रस्तोगी, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव निपुण विनायक, वैद्यकीय शिक्षण सचिव धीरज कुमार, आरोग्य आयुक्त संजय काटकर, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय चंदनवाले, मानद सल्लागार व सदस्य डॉ. कैलाश शर्मा, नवीन खत्री, उपसचिव तथा सदस्य संदीप ढाकणे आदी उपस्थित होते.

### व्यसनमुक्तीच्या चळवळीत सर्वांचे योगदान आवश्यक

मुंबई (दैनिक संध्या) : नैसर्गिकरित्या उपलब्ध होणाऱ्या अमली पदार्थांचे उत्पादन, पुरवठा, खरेदी - विक्री व्यवहार आणि कृत्रिमरित्या तयार करण्यात येणाऱ्या अमली पदार्थांची निर्मिती, पुरवठा व्यवसायाच्या अर्थव्यवस्थेला मुळापासून उखडून टाकण्याचे निर्देश देत सशक्त महाराष्ट्रासाठी व्यसनमुक्तीच्या चळवळीत सर्वांचे योगदान आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे अमली पदार्थ संदर्भातील आयोजित बैठकीत सांगितले. शालेय जीवनापासूनच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांवषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती आणण्यासाठी इयत्ता सातवी ते दहावीच्या अभ्यासक्रमामध्ये अमली पदार्थ दुष्परिणाम विषयक घटकांचा समावेश करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सूचित केले. बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.

# राज्यपालांची छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाला भेट



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी गुरुवारी मुंबईतील ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाला भेट देऊन विविध कलाशैलींमधील ऐतिहासिक व कलात्मक वस्तूंच्या संग्रहाचे अवलोकन केले. यावेळी राज्यपालांनी संग्रहालयाच्या कार्याचे कौतुक केले तसेच देशातील नामशेष होत चाललेल्या पारंपरिक कलांचे जतन करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. संग्रहालयाचे महासंचालक सव्यसाची मुखर्जी यांनी राज्यपालांना संग्रहालयाचा इतिहास, वाटचाल आणि कार्याची माहिती दिली. त्यांनंतर त्यांनी संग्रहालयातील अन्य क्युरेटर्ससह प्राचीन भारत व विश्व दालन, शिल्पकला दालन, हिमालयीन कला दालन तसेच लघुचित्रे आणि वस्त्र संग्रहालय दाखवले. वस्तू संग्रहालय आपले फिरते संग्रहालय तसेच इतर जनजागृती कार्यक्रमांद्वारे सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये देशाच्या समृद्ध वारशाबाबत जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण करण्याचे कार्य करीत असल्याचे मुखर्जी यांनी सांगितले.

# 'संवाद वारी' चित्ररथाला मंत्री शेलार, मंत्री भरणे यांची भेट

## एआय चॅटबॉटच्या प्रश्नमंजूषेचा अनुभव घेत उपक्रमाचे कौतुक

■ पुणे(दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आषाढी वारीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'संवाद वारी' उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या डिजिटल चित्ररथाला आज इंदापूर तालुक्यातील बेलवडी येथे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सदिच्छा भेट दिली. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यादरम्यान त्यांनी डिजिटल चित्ररथातील विविध आधुनिक तंत्रज्ञानाधारित उपक्रमांची पाहणी केली.

यावेळी मंत्री ॲड. शेलार आणि मंत्री भरणे यांनी राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना, विकासकामे आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तयार केलेल्या डिजिटल सादरीकरणाची पाहणी केली. तसेच चित्ररथामध्ये उपलब्ध एआय आधारित चॅटबॉट प्रश्नमंजूषेचा अनुभव घेत शासनाच्या विविध योजनांबाबत प्रश्न विचारले. वारकऱ्यांना




सोप्या आणि आकर्षक पद्धतीने माहिती देणाऱ्या या उपक्रमाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने पारंपरिक वारीसोबत आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाची प्रभावी सांगड घालत शासनाच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. 'संवाद वारी' ही नागरिकांशी प्रभावी संवाद साधणारी संकल्पना असून, डिजिटल माध्यमांचा वापर करून शासनाच्या योजना अधिक सुलभ, आकर्षक आणि परिणामकारक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचविण्याचा हा स्तुत्य प्रयत्न असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनीही वारीसारख्या मोठ्या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यात शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी उभारलेला हा डिजिटल चित्ररथ अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले. एआयसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नागरिकांना त्वरित आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देण्यासाठी असा उपक्रम आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित वारकरी, भाविक आणि नागरिकांनी डिजिटल माहिती, दृश्यफिती तसेच एआय चॅटबॉटच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती जाणून घेत उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा 'संवाद वारी' हा डिजिटल चित्ररथ आषाढी वारी मार्गावरील विविध ठिकाणी वारकरी, भाविक आणि नागरिकांना शासनाच्या लोकाभिमुख योजना, विकासकामे आणि जनकल्याणकारी उपक्रमांची माहिती आधुनिक तंत्रज्ञान आणि लोककलेच्या समन्वयातून प्रभावीपणे उपलब्ध करून देत आहे.

# प्रकल्पग्रस्तांच्या सुलभ पुनर्वसनासाठी व्यापक धोरणात्मक सुधारणांना गती

## प्रकल्पग्रस्तांचे हित केंद्रस्थानी ठेवण्याचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

सार्वजनिक प्रकल्पांसाठी भूसंपादनामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक सुधारणाचा मसुदा सादर करण्याचे निर्देश मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिले. हा मसुदा तयार करतांना प्रकल्पग्रस्तांचे हित केंद्रस्थानी ठेवण्याचे निर्देशही राज्यमंत्री ॲड. जयस्वाल यांनी यावेळी दिले

मंत्रालयात आयोजित या बैठकीमध्ये संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पुनर्वसन कायदा, पर्यायी जमीन वाटप, भूसंचय (लँड बँक), गावठाण भूखंड उपलब्धता आणि प्रकल्पग्रस्तांना रोजगार अथवा विकसित भूखंडाचा पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्यमंत्री ॲड. जयस्वाल म्हणाले, राज्यातील विविध सार्वजनिक प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या नागरिकांच्या पुनर्वसनाशी संबंधित अडचणींबाबत शासन संवेदनशील आहे. त्यामुळे पुनर्वसन धोरणात सुधारणा आवश्यक आहेत. त्याअनुषंगाने पर्यायी जमिनींच्या वाटपासाठी जिल्हानिहाय भूसंचय अधिक सक्षम पद्धतीने करावा. तसेच विस्थापितांना गावठाण भूखंड उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती तसेच नवीन भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना



अधिनियम, २०१३ अंतर्गत प्रकल्पग्रस्तांना एकरकमी भरपाईऐवजी रोजगार अथवा विकसित भूखंडाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र धोरणाचा मसुदा तयार करण्याचे निर्देश ॲड. जयस्वाल यांनी अधिकाऱ्यांना दिले.

राज्यमंत्री ॲड. जयस्वाल म्हणाले, धोरणाचा मसुदा तयार करतांना पुनर्वसन प्रक्रियेत होणारा विलंब टाळण्यासाठी प्रत्येक टप्प्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी. जिल्हानिहाय भूसंचयाची माहिती अद्ययावत ठेवणे, भूसंचय व्यवस्थापनासाठी राज्यस्तरीय संकेतस्थळ विकसित करणे, पर्यायी जमिनींच्या वाटपाची प्रक्रिया अधिक पारदर्शक करणे आणि विभागीय आयुक्त स्तरावर नियमित आढावा घेण्याची कार्यपद्धती विकसित करणे आदी सर्व महत्वाच्या मुद्द्याचा त्यात समावेश करण्याचे निर्देश त्यांनी दिले. गावठाण भूखंड वाटपासाठी स्वतंत्र कार्यपद्धती तयार करणे, उर्वरित उपलब्ध गावठाण जमिनींची मोजणी व नोंदणी करणे, नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढविणे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाशी संबंधित निर्णय अधिक वेगाने घेण्याचे निर्देशही राज्यमंत्री मंत्री ॲड. जयस्वाल यांनी यावेळी दिले. राज्यमंत्री ॲड. जयस्वाल म्हणाले, विकसित महाराष्ट्र – २०४७ चे ध्येय गाठण्यासाठी नवीन प्रकल्प, मोठमोठे उद्योग राज्यात उभारणे अनिवार्य आहे. राज्याचा विकास साध्य करण्यासाठी आवश्यक महसूल याद्वारेच वाढणार आहे. मात्र त्याचवेळी प्रकल्पग्रस्तांचे हित जोपासणेदेखील तेवढेच महत्वाचे आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया अधिक परिणामकारक, वेळबद्ध आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश राज्यमंत्री जयस्वाल यांनी दिले.

# संत्रा क्लस्टरबाबत आढावा बैठक

■ मुंबई (दै. संध्या)

विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आणि संत्रा मूल्यसाखळी अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने संत्रा क्लस्टर उपक्रमाबाबत कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत संत्रा क्लस्टरच्या प्रस्तावित आराखड्याचा आढावा घेण्यात आला. यामध्ये रोगमुक्त लागवड साहित्य उपलब्ध करणे, उच्च तंत्रज्ञानाधारित रोपवाटिका विकसित करणे, जुन्या बागांचे पुनरुज्जीवन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, सूक्ष्म सिंचन, काढणीनंतरचे व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन, ब्रँडिंग आणि देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठेशी थेट जोडणी निर्माण करण्याच्या विविध उपाययोजनांवर चर्चा झाली.

संत्रा पीकावर प्रक्रिया, मूल्यवर्धन, ब्रँडिंग आणि निर्यातक्षमतेपर्यंत सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, उपसचिव श्रीकांत आंडगे, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार सुमित वानखेडे, आमदार उमेश यावलकर, माजी आमदार आशिष देशमुख, कृषी आयुक्त, कृषी संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री ॲड. जयस्वाल यावेळी म्हणाले, संत्रा क्लस्टर हा केवळ विकास प्रकल्प नसून विदर्भातील संत्रा



उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणारा आणि जागतिक बाजारपेठेत महाराष्ट्राच्या संत्र्याला नवी ओळख मिळवून देणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल म्हणाले, नागपूर, अमरावती आणि वर्धा या संत्रा उत्पादक पट्ट्यात हवामान बदल, रोगांचा प्रादुर्भाव, दर्जेदार लागवड साहित्याची कमतरता आणि काढणीनंतरच्या व्यवस्थापनातील अडचणी यांसारख्या आव्हानांवर एकात्मिक उपाययोजना करण्यासाठी क्लस्टर पद्धतीने संपूर्ण मूल्यसाखळी प्राधान्याने मजबूत करावी. या पट्ट्यातील रोपवाटिकांची विशेष तपासणी करून समग्र आढावा घ्यावा, तसेच नर्सरीधारकांसाठी प्राधान्याने कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश मंत्री ॲड. जयस्वाल यांनी दिले. कृषी राज्यमंत्री ॲड. जयस्वाल म्हणाले, लिंबूवर्गीय फळ सुधार केंद्रातर्गत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी नियमित मार्गदर्शक कार्यशाळा प्राधान्याने आयोजित कराव्यात.

# मुख्यमंत्री यांचा वाढदिवस व दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यात 'महा आरोग्य शिबिर' – वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ




■ मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर २२ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत 'महा आरोग्य शिबिर' ओयोजित करण्यात आले आहे. या अभियानाची सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, संलग्न रुग्णालये तसेच शासकीय दंत, आयुर्वेद आणि होमिओपॅथी महाविद्यालयांनी अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. या अभियानाचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांना मिळावा, यासाठी व्यापक जनजागृती करून शिबिरे यशस्वी करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

मंत्रालयात राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयांच्या अधिष्ठात्यांच्या आयोजित बैठकीत त्यांनी या अभियानाच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेत विविध सूचना दिल्या. यावेळी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी तसेच राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय, दंत व होमिओपॅथी महाविद्यालयांचे अधिष्टाता यावेळी व्हीसीव्दारे उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षणमंत्री मुश्रीफ म्हणाले की, प्रत्येक महाविद्यालयाने विभागनिहाय समित्या स्थापन करून नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. समित्यांची यादी तातडीने संचालनालयाकडे पाठवावी. वैद्यकीय महाविद्यालये, संलग्न रुग्णालये, यूएचटीसी आणि आरएचटीसी येथे शिबिरासाठी योग्य ठिकाण निश्चित करून आवश्यक सर्व पूर्वतयारी वेळेत पूर्ण करावी. शिबिरांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी यासाठी प्रत्येक संस्थेमध्ये स्वतंत्र प्रसार व जनजागृती समिती स्थापन करून फ्लेक्स, पोस्टर्स, सार्वजनिक ध्वनीप्रणाली, समाजमाध्यमे तसेच इतर माध्यमांचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री संत सोपानकाका महाराज पालखी मार्गस्थ झाल्यानंतर पालखी मार्ग चकाचक

बारामती (दैनिक संध्या) : बारामती मुक्कामी श्री संत सोपानकाका पालखीचे भक्तीमय वातावरणात आगमन होताच दर्शनासाठी गर्दी झाली होती.पालखी बारामतीकडे मार्गस्थ झाल्यावर शारदानगर ते बारामती पालखी मार्गाची स्वच्छता करण्यासाठी नगरपालिकेची टीम तयार होती.पालखी पुढे गेली की लगेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी पालखी मार्ग चकाचक केला.

### जुन्नर पोलिसांची धडक कारवाई; 270 किलो गोमांस जप्त

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर शहरातील माई मोहल्ला भागात पोलिसांनी पहाटेच्या सुमारास एका खोलीवर धाड टाकून तब्बल २७० किलो गोवंश मांस जप्त केले आहे. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले असून,चौघे जण फरार संशयितांचा शोध सुरू आहे. अशी माहिती जुन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांनी दिली. गुरुवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास माई मोहल्ला येथे गोवंशाची कत्तल करून मांस एका खोलीत लपवून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या आदेशानुसार, पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड आणि पोलीस उपनिरीक्षक ऋषिकेश टिटमे यांच्या पथकाने या ठिकाणी पाळत ठेवून छापा टाकला. या कारवाईत खोलीतून २७० किलो गोमांस जप्त करण्यात आले. याप्रकरणी रेहान दस्तगीर कुरेशी वय ३५, रा. माई मोहल्ला, अदनान अल्ताफ बेपारी वय २५, रा. शिपाई मोहल्ला, आतिक अहमद कुरेशी वय ३६, रा. माई मोहल्ला यांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान बिलाल दस्तगीर कुरेशी, समीर सोहेल कुरेशी, मुजम्मिल मुतम्मिल कुरेशी आणि शरीन इब्राहिम बेपारी सर्व राहणार माई मोहल्ला ,जुन्नर हे आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. ज्या खोलीत हे मांस सापडले ती खोली फुरकान इब्राहिम बेपारी याच्या मालकीची असून, त्याच्यावर यापूर्वीही गोवंशासंदर्भातील गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याच कारवाईदरम्यान जुन्नर पोलीस ठाण्यातील आर्म्स ॲक्ट प्रकरणातील संशयित मोहसीन इकबाल अत्तार वय २४ यालाही अटक करण्यात आली असून, त्याला न्यायालयात हजर करण्यात आले.




### पिंपळवंडी ग्रामपंचायत कारभाराविरोधात मयूर काचळे यांचे आमरण उपोषण

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी ग्रामपंचायतीमधील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि प्रशासकीय दिरंगाई विरोधात सामाजिक कार्यकर्ते मयूर काचळे यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. मयूर काचळे यांच्या आरोपानुसार, ग्रामपंचायतीमध्ये कर वसुलीत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून, ग्रामसभांच्या निर्णयांची अंमलबजावणी केली जात नाही. तसेच, माहिती अधिकारांतर्गत मागवलेली माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. या विविध मुद्द्यांवर त्यांनी यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रीतसर तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर त्यांनी हे आंदोलनाचे पाऊल उचलले आहे. काचळे यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनेक विकासकामे केवळ कागदोपत्री पूर्ण दाखवून प्रत्यक्षात ती अपूर्ण ठेवण्यात आली आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाकडून दिशाभूल करणारे अहवाल सादर केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. या संदर्भात पिंपळवंडीच्या सरपंच मेघा काकडे यांनी सांगितले की, उपोषणकर्त्यांच्या मागण्या या ग्रामपंचायत कार्यालयाच्या दप्तरासंदर्भात नसून, प्रशासकीय पातळीवरील आहेत. त्यामुळे वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी यावर योग्य ती अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शरद लेंडे, जुन्नर पंचायत समितीच्या सभापती संगीता वाघ, जिल्हा परिषदेचे विद्यमान सदस्य मंगेश काकडे, जुन्नर पंचायत समितीचे माजी उपसभापती शिवाजी काकडे यांचे हे पिंपळवंडी गाव असल्याने येथील उपोषणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, याबाबत वेगवेगळी चर्चा सुरू झाली आहे.

# कौशल्य प्रशिक्षणामुळे युवक आत्मनिर्भर बनतील – डॉ. बबन जोगदंड

## बार्टी व सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कच्या संयुक्त उपक्रमातून जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त १८० प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण

पुणे (दै. संध्या)

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पदवी मिळवून रोजगार मिळणे कठीण झाले असून, युवकांनी कौशल्याधारित शिक्षण घेऊन स्वतःला सक्षम बनविणे ही काळाची गरज आहे. कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगारासह स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, त्यातून युवक आत्मनिर्भर बनू शकतात, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)च्या कौशल्य विकास विभागाचे प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी केले. जागतिक युवा कौशल्य



दिनानिमित्त बार्टी आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क (एसटीपी) यांच्या संयुक्त विद्यमाने हडपसर येथील एस. एम. जोशी महाविद्यालय परिसरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील इनोव्हेशन फाउंडेशनच्या सी-थ्री-आय (CIII) केंद्रात आयोजित कार्यक्रमात अनुसूचित जातीतील १८० युवक-युवतींना आधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि विविध मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन बार्टीच्या महासंचालक श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे (भा.प्र.से.) आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस. एम. जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एकनाथ एस. मुंढे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बबन जोगदंड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संजय अहिवळे, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक महेश गवई तसेच लक्ष्मीबाई भाऊराव पाटील इनोव्हेशन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत कुंदन उपस्थित होते. डॉ. जोगदंड म्हणाले, "बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात कौशल्य विकास हेच रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. उद्योगांच्या गरजेनुसार आधुनिक कौशल्ये आत्मसात करणारे युवक भविष्यात अधिक स्पर्धाक्षम ठरतील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासाची कास धरणे आवश्यक आहे." या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील १८० हून अधिक अनुसूचित जातीच्या पात्र युवक-युवतींना उद्योग क्षेत्रातील वाढत्या मागणीचा विचार करून अत्याधुनिक व पूर्णपणे रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये ग्राफिक डिझाइन, सोशल मीडिया एक्झिक्युटिव्ह, आयटी हेल्प डेस्क असिस्टंट, डेस्कटॉप पब्लिशिंग, ड्रोन सर्व्हिस टेक्निशियन आणि इलेक्ट्रिक वाहन देखभाल तंत्रज्ञ या अभ्यासक्रमांचा समावेश होता. या प्रशिक्षणामुळे डिजिटल अर्थव्यवस्था, माहिती तंत्रज्ञान, ड्रोन तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रिक वाहन उद्योगासारख्या वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

### उपजीविका, सुरक्षितता आणि परवडणारी शहरी वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी

# बाईक टॅक्सी नियमनात देशव्यापी सुसंगतीची गरज : कट्स इंटरनॅशनल




पुणे (दै. संध्या)

देशातील बाईक टॅक्सी सेवांसाठी राज्यनिहाय असलेल्या विसंगत नियमांऐवजी पुराव्यांवर आधारित, सुसंगत आणि संतुलित नियामक चौकट तयार करण्याची गरज असल्याचे मत भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते (आर्थिक विषय) गोपालकृष्ण अग्रवाल यांनी व्यक्त केले. "भारत 'ईज ऑफ लिव्हिंग'च्या दिशेने वाटचाल करत असताना संपर्क, रोजगारनिर्मिती, उत्पादकता आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी एकात्मिक शहरी गतिशीलता व्यवस्था आवश्यक आहे," असे ते म्हणाले. कट्स इंटरनॅशनलच्या 'हार्मोनायझिंग बाईक टॅक्सी रेग्युलेशन्स : एव्हिडन्स-बेस्ड असेसमेंट अँड सजेस्टेड पाथवेज फॉर रिफॉर्म' या अहवालाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते.

अहवालानुसार, बाईक टॅक्सी ही भारतातील शहरी वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनली असून फर्स्ट आणि लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यास ती उपयुक्त ठरत आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ आणि मोटार वाहन ॲग्रिगेटर मार्गदर्शक तत्त्वे, २०२५ अंतर्गत या सेवांना कायदेशीर आधार असला तरी विविध राज्यांतील वेगवेगळ्या नियमांमुळे प्रवासी, गिग कामगार, प्लॅटफॉर्म आणि नियामकांमध्ये अनिश्चितता निर्माण होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अहवालात बाईक टॅक्सीचे भाडे प्रतिकिलोमीटर ८ ते १० रुपये असल्याने हा पर्याय ऑटो आणि टॅक्सीपेक्षा अधिक परवडणारा असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच युवक आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना कमी गुंतवणुकीत रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून चालकांना दरमहा सरासरी २५ ते ३० हजार रुपये निव्वळ उत्पन्न मिळू शकते, असेही नमूद करण्यात आले आहे.

# आळेफाटा पशुधन बाजारात १.०३ कोटींची उलाढाल

नारायणगाव (दै. संध्या)

आळेफाटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दुय्यम बाजार आवारात भरलेल्या साप्ताहिक बाजारपेठेत गायींच्या खरेदी-विक्रीला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या बाजारात आलेल्या एकूण ५०७ गायींपैकी ४८९ गायींची विक्री झाली असून, यातून १ कोटी ३ लाख ७८ हजार ८०० रुपयांचा विक्रमी उलाढाल झाली आहे

या बाजारात पुणे, अहमदनगर आणि इतर भागांतून शेतकरी व व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बाजारात गायींचे भाव ५ हजार रुपयांपासून ते ७० हजार रुपयांपर्यंत राहिले. आळेफाटा येथील हा साप्ताहिक बाजार पशुपालकांसाठी अतिशय महत्त्वाचा ठरत असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. दर गुरुवारी भरणारा हा बाजार सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत सुरू असतो.

कृषी उत्पन्न बाजार समिती, जुन्नरचे सभापती ॲड. संजय शिवाजीराव काळे, उपसभापती निवृत्ती मुरलीधर काळे, व्यवस्थापक सतीश मस्करे तसेच संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली बाजाराचे नियोजन करण्यात आले.

# मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा गुलाब पानपाटील

पिंपरी (दै. संध्या)

मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पातील इमारत कोसळून नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झालेल्या दुर्घटनेप्रकरणी संबंधितांवर सखोल चौकशी करून कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन सेनेचे शहराध्यक्ष गुलाब पानपाटील यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या प्रकल्पातील तुलनेने नव्या इमारतीचे कोसळणे ही अत्यंत गंभीर बाब असून, त्यामुळे बांधकामाचा दर्जा, संरचनात्मक रचना (डिझाईन), गुणवत्ता नियंत्रण, देखरेख आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व तांत्रिक चौकशी करून बांधकामातील निकृष्ट दर्जा, संरचनात्मक त्रुटी, निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन आढळल्यास



संबंधित बिल्डर, आर्किटेक्ट, स्ट्रक्चरल (RCC) डिझायनर, स्ट्रक्चरल प्रूफ चेकर, अभियंते, पर्यवेक्षक आणि जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच लागू कायद्यांनुसार सदोष मनुष्यवधासह इतर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. रिपब्लिकन सेनेने दुर्घटनाग्रस्त इमारतीचे स्वतंत्र शासकीय तज्ज्ञ समितीकडून स्ट्रक्चरल ऑडिट व फॉरेन्सिक तपासणी, मंजूर नकाशे व गुणवत्ता चाचणी अहवालांची पडताळणी, दोषींवर फौजदारी व विभागीय कारवाई तसेच संपूर्ण चौकशी अहवाल सार्वजनिक करण्याचीही मागणी केली आहे.

# पाणीप्रश्नाबाबत अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांची पाहणी

## नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

पुणे (दै. संध्या)

धायरी व प्रभाग क्रमांक ३३ मधील पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर व मुख्य अभियंता (पाणीपुरवठा) नंदकिशोर जगताप यांनी आज धायरी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पुणे महानगरपालिकेतील गटनेते व नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांनी या प्रश्नाबाबत सातत्याने केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत ही पाहणी करण्यात आली. धायरीसह समाविष्ट गावात प्रत्येक पावसाळ्यात मुसळधार पावसानंतर पाणीपुरवठ्याच्या स्रोतांमध्ये गढूळ व दूषित पाणी मिसळत असल्याने हजारो नागरिकांना अस्वच्छ व अपुरा पाणीपुरवठा सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या



आरोग्याशी संबंधित हा गंभीर प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांनी पुणे महानगरपालिकेकडे वारंवार पाठपुरावा केला होता. त्यासोबतच सभागृहातही हा प्रश्न उपस्थित केला होता.

आज झालेल्या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी बारंगणी मळा येथील विहीर, परिसरातील पाणीपुरवठा टाक्या तसेच पाणीपुरवठा यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी काकासाहेब चव्हाण यांनी धायरीकरांना वर्षभर पुरेसे, शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी विविध पर्यायी उपाययोजना अतिरिक्त आयुक्तांसमोर मांडल्या. तसेच समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत व्यंकटेश सेरेनिटी येथे उभारण्यात आलेल्या टाकीची झालेली दुरवस्था निदर्शनास आणून देत तेथे तातडीने दुरुस्ती व आवश्यक कामे करण्याची मागणी केली.

याशिवाय धायरी परिसराचा वाढता विस्तार लक्षात घेता भविष्यातील पाणीगरज पूर्ण करण्यासाठी नवीन जलसाठा व्यवस्था, पाणी साठवण क्षमता वाढविणे, पाणीपुरवठा यंत्रणेचे सक्षमीकरण तसेच क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून दीर्घकालीन नियोजन करण्याची आवश्यकता असल्याचे काकासाहेब चव्हाण यांनी यावेळी नमूद केले.

यावर अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सर्व बाबींची सविस्तर तपासणी करून नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध होण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच दीर्घकालीन उपाययोजनांबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या पाहणीदरम्यान नगरसेविका अनिता इंगळे, नगरसेविका धनश्री कोल्हे, नगरसेवक सुभाष नाणेकर, संदीप चव्हाण, दशरथ मणेरे यांच्यासह पाणीपुरवठा विभागांचे अधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# कोणाच्या सांगण्यावरून खोदला कालवा?

## पिंपळगाव जोगा कालवा प्रकरणी ओतूर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस

ओतूर (दै. संध्या)

पिंपळगाव जोगा धरणाच्या डाव्या कालव्यामध्ये विनापरवानगी खोदकाम करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर पाटबंधारे विभागाने ओतूर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधितांवर केवळ नोटीस देण्याऐवजी कठोर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



जुन्नर तालुक्यात काही दिवसांपूर्वी सलग दोन ते तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील पाणी कालव्यात खोदकाम करून सोडण्यात आले.अशा परिस्थितीत कालव्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विनापरवानगी खोदकाम करणे किंवा पाईप टाकणे अत्यंत धोकादायक मानले जाते. तज्ज्ञांच्या मते, कालव्यामध्ये अशा प्रकारचे अनधिकृत काम झाल्यास पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण होऊ शकतात. परिणामी कालव्याच्या संरचनेवर ताण येऊन भविष्यात कालवा फुटण्यासारख्या गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यापूर्वीही पिंपळगाव जोगा परिसरात कालवा फुटल्याची मोठी दुर्घटना घडली होती. त्या घटनेत शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली होती. उभी पिके, शेतीची माती आणि सिंचन व्यवस्था यांचे मोठे नुकसान झाले होते. त्या दुर्घटनेच्या आठवणी अद्याप ताज्या असताना पुन्हा अशा प्रकारचे विनापरवानगी खोदकाम झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीती आणि नाराजी वाढली आहे. दरम्यान, पाटबंधारे विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत ओतूर ग्रामपंचायतीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. संबंधित काम कोणाच्या परवानगीने करण्यात आले, त्यासाठी विभागाची मंजुरी घेण्यात आली होती का, तसेच नियमांचे पालन करण्यात आले होते का, याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, केवळ नोटीस देऊन हा विषय संपवू नये, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. या प्रकरणातील दोषी अधिकारी, कर्मचारी किंवा संबंधित व्यक्तींवर सिंचन कायद्याअंतर्गत कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच ओतूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी संतप्त शेतकरी करीत आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, कालव्यासारख्या संवेदनशील सार्वजनिक मालमत्तेवर विनापरवानगी हस्तक्षेप करणे हा अत्यंत गंभीर प्रकार असून, अशा घटनांकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात मोठी जीवित व वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे. आता या नोटीसी नंतर ओतूर ग्रामपंचायतीकडून काय स्पष्टीकरण दिले जाते आणि पाटबंधारे विभाग पुढे कोणती भूमिका घेतो, याकडे परिसरातील शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे. जर या प्रकरणात ठोस कारवाई झाली नाही, तर भविष्यात उद्भवणाऱ्या कोणत्याही गंभीर परिणामांची जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील, अशी तीव्र भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

# वीज कपातीने गावचे जनजीवन विस्कळीत

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील खामुंडी गावामध्ये गेल्या काही दिवसांपासून रात्री ९:३० वाजल्यापासून ते थेट पहाटेपर्यंत वारंवार वीज खंडित होत आहे. या अघोषित वीज कपातीमुळे ग्रामस्थ प्रचंड संतप्त झाले आहेत. वीज पुरवठा खंडित होत असल्याची कोणतीही पूर्वकल्पना महावितरणकडून दिली जात नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या भागात आधीच बिबट्याचा वावर आणि दहशत मोठ्या प्रमाणावर आहे. अशा परिस्थितीत रात्रीच्या वेळी संपूर्ण गाव अंधारात असल्याने ग्रामस्थांच्या आणि पाळीव प्राण्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. रात्रीच्या अंधारात बिबट्याच्या हल्ल्याची भीती अधिकच वाढली आहे. सततच्या वीज खंडित होण्यामुळे विविध क्षेत्रांवर वाईट परिणाम झाला आहे. विजेअभावी पिकांना पाणी देणे कठीण झाले असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. रात्रीच्या वेळी वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे



मोठे नुकसान होत आहे. स्थानिक लघुउद्योग आणि व्यवसायांना या लोडशेडिंगचा मोठा आर्थिक फटका बसत आहे. अघोषित वीजकपात तात्काळ बंद करावी, फीडरची दुरुस्ती करून वीजपुरवठा सुरळीत करावा आणि रात्रीऐवजी दिवसा भारनियमनाचे नियोजन करावे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके, जितेंद्र रोकडे, सागर डुंबरे, अनिल बोडके, अश्विन आंधळे, नवनाथ शिंगोटे या ग्रामस्थांनी केली आहे. येत्या ८ दिवसांत हा प्रश्न न सुटल्यास महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या संदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, तांत्रिक कारणांमुळे वीज पुरवठ्यात अडथळा येत असल्याचे त्यांनी सांगितले. वरिष्ठ पातळीवर चर्चा करून या समस्येवर लवकरात लवकर पर्यायी व्यवस्था केली जाईल आणि वीज पुरवठा सुरळीत केला जाईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे.